❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. ०३ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २१९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# फडणवीस राज्यातच राहणार

### वावड्यांवर विश्वास ठेवू नका : चंद्रशेखर बावनकुळेंचे स्पष्टीकरण, शिंदेंच्या नेत्यांवर नाराजी व्यक्त

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रात जाणार असल्याच्या चर्चांवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पूर्णविराम दिला आहे. "देवेंद्र फडणवीस केंद्रात जाण्याच्या अफवांवर आणि वावड्यांवर कोणीही विश्वास ठेवू नये. विकसित महाराष्ट्राचा संकल्प देवेंद्र फडणवीस हेच पूर्ण करू शकतात," असा विश्वास व्यक्त करत बावनकुळे यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या दाव्याचा समाचार घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर कार्यक्रमासाठी बावनकुळे रत्नागिरीत आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात मनुष्यबळ विकास खाते सांभाळण्याचा सल्ला दिल्याचा दावा संजय राऊत यांनी केला होता. यावर बोलताना बावनकुळे म्हणाले, "संजय राऊत यांच्याकडे नक्की कोणता तिसरा डोळा आहे, हे मला माहित नाही. परंतु देवेंद्र फडणवीस साहेब महाराष्ट्रातच राहणार आहेत. विरोधक पसरवत असलेल्या अशा कोणत्याही वावड्यांवर नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी विश्वास ठेवू नये."

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेणारे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट



आणि आमदार बच्चू कडू यांच्यावर चंद्रशेखर बावनकुळे यांनी कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली. "सत्तेत असताना महायुतीच्या नेत्यांनी असे वर्तन करणे पूर्णपणे अयोग्य आहे. एकनाथ शिंदे यांनी अशा लोकांवर कडक कारवाई केली पाहिजे. शेवटी हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे, मात्र महायुतीत राहून त्यांच्या नेत्यांनी कसे वागले पाहिजे हे एकनाथ शिंदे यांनीच नक्की ठरवावे," असा सल्ला त्यांनी दिला. रत्नागिरीच्या भूमीत पार पडलेल्या महाराजस्व समाधान शिबिरात बोलताना महसूलमंत्र्यांनी शेतकरी, कोतवाल आणि जमिनींच्या संदर्भात अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या.

कोतवालांना तलाठी भरतीमध्ये २० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय सरकार लवकरच घेणार असल्याची अधिकृत घोषणा त्यांनी केली. जमिनीच्या खरेदी-विक्रीत होणारे गैरप्रकार थांबवण्यासाठी "आधी मोजणी आणि नंतरच नोंदणी" असा नवीन कायदा सरकार आणत आहे. जमिनीची अधिकृत मोजणी केल्याशिवाय कोणतेही रजिस्ट्रेशन होणार नाही. राज्यातील शेतकऱ्यांना यापुढे कृषी पंपाचे बिल भरावे लागणार नाही. तसेच शेतमजूर महिलांनाही 'शेतकरी' दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. देवस्थान आणि इनाम जमिनींबाबतचा नवा कायदा आगामी डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात मंजूर करून सर्वसामान्यांना न्याय दिला जाईल. घूसखोरी आणि मृत व्यक्तींची नावे वगळण्यासाठी सुरू असलेल्या एसआयआर मोहिमेत चिपळूण मतदारसंघ राज्यात प्रथम आला आहे, तर रत्नागिरी जिल्ह्याने संपूर्ण राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे. त्याबद्दल त्यांनी महसूल अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# आधी मुलीने माफी मागितली, आता आईने मोदींचे आभार मानले

### पंतप्रधानांनी माफ केल्याने मुलीला नवीन जीवन मिळाले

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मातोश्रींविरुद्ध आक्षेपार्ह शब्दांचा वापर करणाऱ्या एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीला पंतप्रधान मोदींनी माफ केल्यानंतर, त्या मुलीच्या आईने पंतप्रधानांचे मनापासून आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदींच्या या माफीच्या निर्णयाने माझ्या मुलीला नवीन जीवनदान दिले आहे, अशा शब्दांत त्या आईने पीटीआय वृत्तसंस्थेशी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या एका आंदोलनादरम्यान या अल्पवयीन मुलीचा आक्षेपार्ह टिप्पणी करणारा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. यानंतर खुद्द पंतप्रधान मोदींनी संयम बाळगण्याचे आवाहन करत त्या मुलीला माफ केले होते. वृत्तसंस्था पीटीआयशी बोलताना मुलीच्या आईने हात जोडून पंतप्रधान मोदींचे आभार मानले. त्या म्हणाल्या, "माझ्या मुलीने अत्यंत चुकीच्या भाषेचा वापर केला होता, परंतु पंतप्रधानांनी बदला घेण्याऐवजी क्षमेचा मार्ग निवडून आपली महानता सिद्ध केली आहे. आज पंतप्रधानांचा वाढदिवस असून त्यांनी माझ्या मुलीला दिलेली ही माफी म्हणजे तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी भेट आणि पुनर्जन्म आहे." मुलीच्या आईने पुढे एक भावूक



मागणी करत म्हटले की, "मोदीजींनी माझ्या मुलीला माफ करून खूप मोठे काम केले आहे. आता माझी एकच विनंती आहे की त्यांनी माझ्या मुलीला दत्तक घ्यावे." या घटनेचा उल्लेख करताना मुलीच्या आईने लहान मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, "कमी वयातील मुले सहजपणे चुकीच्या संगतीला आणि चुकीच्या विचारांना बळी पडतात. त्यामुळे मुलांसाठी इंस्टाग्रामसारखे प्लॅटफॉर्म पूर्णपणे बंद केले पाहिजे, जेणेकरून कोणतीही मुले अशा भलत्या प्रकरणात अडकणार नाहीत."

## थोडक्यात...

### चोपड्यात बापाचा मुलांवर कुऱ्हाडीने हल्ला

चोपडा : दैनिक संध्या

जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील वडती येथे खळबळजनक घटना समोर आली आहे. एका पित्याने आपल्याच दोन निष्पाप मुलांवर कुऱ्हाडीने वार केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात 12 वर्षीय बालिकेचा जागीच मृत्यू झाला असून, 10 वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. हा थरारक प्रकार एका लहान मुलामुळे उघडकीस आला. गावकरी आणि पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक लहान मुलगा 10 वर्षांच्या रामूला गोट्या खेळण्यासाठी घरी बोलवायला गेला होता. त्यावेळी रामू घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेला त्याला दिसला. लहान मुलाने तात्काळ या घटनेची माहिती गावातील इतर लोकांना दिली. गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. सुभाष भिलाला असे या संशयित आरोपीचे नाव असून, तो अवघ्या आठ दिवसांपूर्वीच कारागृहातून सुटून आला होता. कारागृहातून परतल्यानंतर त्याने आपल्याच वडती गावातील राहत्या घरी निष्पाप मुलांवर कुऱ्हाडीने हल्ला केला. घटनेची माहिती मिळताच चोपडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून संशयित आरोपी सुभाष भिलाला याला ताब्यात घेतले आहे.

### ऑनलाईन पद्धतीने २८ लाखांना गंडा!

अहिल्यानगर : दैनिक संध्या

सायबर गुन्हेगारांच्या ऑनलाइन पद्धतीने लुटीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सावेडी उपनगरात लागोपाठ दोन दिवस घडलेल्या घटनांतून २८ लाख ५६ हजारांची रक्कम ऑनलाइन पद्धतीने लुटण्यात आली. एका ज्येष्ठ नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून १५ लाख रुपयांना गंडा घालण्यात आला तर दुसऱ्या एका घटनेत ई-मेल हॅक करून उद्योजकाची १३ लाख ५६ हजारांची फसवणूक करण्यात आली. अरविंदकुमार विनायक विसपुते (वय ७६, गुलमोहर रस्ता, सावेडी, अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या ज्येष्ठाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून 'संदीपराव' या नावाने व्हाट्सअप वापरकर्ता व संशयित बँक खातेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सायबर भामट्याने अरविंदकुमार विसपुते यांना व्हाट्सअपवर व्हिडिओ कॉल केला. आपण नाशिक शहर पोलीस मुख्यालयातून संदीपराव बोलत असल्याचे त्याने सांगितले. तुमचे बँक खाते आंतरराष्ट्रीय स्तरावर बेकायदेशीर पैशांसाठी वापरले गेले असून तुम्हाला 'डिजिटल अरेस्ट' करण्यात आली आहे अशी भीती व्हाट्सअप कॉल व्हिडिओ कॉल करणाऱ्या व्यक्तीने दाखवली. कारवाई टाळायची असेल तर पैसे पाठवावे लागतील, असे सांगून या सायबर भामट्याने जेष्ठाला घाबरवले. घाबरलेल्या विसपुते यांनी त्यांच्या बँक ऑफ बडोदा खात्यातून १५ लाख रुपये 'आरटीजीएस'द्वारे सायबर भामट्याच्या खात्यावर वर्ग केले. नंतर विसपुते यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

### मंत्री पंकजा मुंडेंच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

अहिल्यानगर : दैनिक संध्या

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांच्या एका वक्तव्याची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. बीड जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना मंत्री पंकजा मुंडे यांनी थेट 'राजकारणातून रिटायर्ड व्हावं वाटतंय', असं मोठं वक्तव्य केलं आहे.

# जीवघेण्या खड्ड्यानं घेतला महिलेचा बळी

### दुचाकी घसरल्यानं ट्रकखाली सापडून जागीच मृत्यू, ठाणे-भिवंडी मार्गावरील घटना

■ ठाणे (दै. संध्या)

ठाणे-भिवंडी मार्गावर धक्कादायक घटना घडली आहे. या मार्गावर असणाऱ्या जीवघेण्या खड्ड्याने एका महिलेचा बळी गेल्याची घटना घडली आहे. दुचाकी घसरून ट्रकखाली सापडून महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ठाणे-भिवंडी मार्गावरील राहणाळ इथे हा भीषण अपघात झाला आहे. ठाणे-भिवंडी मार्गावरील राहणाळ गावाच्या हद्दीत रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यामुळे झालेल्या




अपघातात एका 46 वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. खड्ड्यात दुचाकी गेल्याने ती घसरली आणि रस्त्यावर पडलेल्या महिलेला मागून येणाऱ्या ट्रकने चिरडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मृत महिलेचे नाव सुनिता अक्षयलाल पाल (वय 46) असे असून त्या ठाण्यातील मनोरमा नगर परिसरातील रहिवासी होत्या. त्यांचे पती अक्षयलाल पाल यांच्यासह त्या भिवंडीतील अंजूर फाटा परिसरात फ्लॅट पाहण्यासाठी ॲक्टिवा दुचाकीवरून येत होत्या. राहणाळ गावाजवळील काँक्रीट रस्त्यावर खड्डे पडले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचले होते. त्यामुळे खड्ड्याचा अंदाज न आल्याने दुचाकी खड्ड्यात गेली आणि घसरली. अपघातात अक्षयलाल पाल हे रस्त्याच्या कडेला पडले, तर सुनिता पाल या रस्त्याच्या मधोमध पडल्या. त्याचवेळी मागून येणाऱ्या ट्रकने त्यांना चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात अक्षयलाल पाल जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच नारपोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास नारपोली पोलीस करत आहेत. दरम्यान, भिवंडी शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. अनेक काँक्रीट रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असून पावसामुळे त्यामध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी वारंवार अपघात घडत असून निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत आहे.

# नाशिकच्या खड्ड्यांवरून भुजबळ-महाजनांमध्ये 'अबोला'?

### छगन भुजबळांनी सर्व चर्चांना दिला पूर्णविराम, म्हणाले- "ते मीडियाने तयार केलेले चित्र.."

■ नाशिक (दै. संध्या)

नाशिक शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि खड्ड्यांमुळे आतापर्यंत पाच नागरिकांचा नाहक बळी गेल्याने हा प्रश्न आता राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मंत्री छगन भुजबळ यांनी महापालिका प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांच्या या भूमिकेवर मंत्री गिरीश महाजन यांनी आपली प्रतिक्रिया दिल्यानंतर, या दोन्ही नेत्यांमध्ये अबोला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार रंगली होती. मात्र, आता स्वतः छगन भुजबळ यांनी यावर स्पष्टीकरण देत या सर्व राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला आहे. नाशिक शहरातील खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत तीव्र संताप व्यक्त करत मंत्री छगन भुजबळ यांनी रस्त्यांच्या कामातील निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत देण्याची आग्रही मागणी केली. यावेळी प्रशासनाच्या कारभारावर ताशेरे ओढताना भुजबळ म्हणाले की, "जेवढे लोक मृत्यूमुखी पडले आहेत, ते शासनाच्या महापालिका यांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूमुखी पडले आहेत. एकाला जसा न्याय दिला तशीच रक्कम सर्वांना दिली पाहिजे. मंत्री गिरीश महाजनांनी याकडे लक्ष



दिले पाहिजे. जबाबदारी एकमेकांवर ढकलून चालणार नाही." त्यांच्या या थेट वक्तव्यानंतर महायुतीतील या दोन वरिष्ठ मंत्र्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली होती, ज्यावर आता मंत्री गिरीश महाजन यांनी आपले स्पष्टीकरण दिले आहे.

गिरीश महाजन यांनी भुजबळ यांच्या विधानावर बोलताना म्हटले की, जबाबदारी माझी आहे, मी कुंभमेळा मंत्री आहे. यापूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणात कामे झाली होती का? नाशिककरांना त्रास होणार आहे हे मी सांगितले होते. डांबरी रस्ते टिकत नाहीत त्यामुळे व्हाइट टॉपिंग करत आहोत. चाळीस हजार कोटी खर्च करून चेहरा मोहरा बदलत आहे. एका रोडखाली सात प्रकारची युटिलिटी करत आहोत. सुविधा मिळणार आहे, कॅमेरा लावत आहोत. नवीन आणि मॉडर्न नाशिक आपण करत आहोत. येणाऱ्या सहा महिन्यात कामे पूर्ण होतील. नाशिककर म्हणतील आमच्या शहरासारखे शहर नाही, असे महाजन यांनी म्हटले आहे.

तर गिरीश महाजन यांच्यासोबत छगन भुजबळ यांनी अबोला धरल्याच्या चर्चा आहेत. यावर भुजबळ म्हणाले, हे सगळे मीडियाने क्रिएट केलेले पिक्चर आहे. तसेच साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक लोकार्पण सोहळ्यात झालेल्या प्रसंगाचा उल्लेख करत भुजबळ म्हणाले, किंबहुना वरती हार घालायला जाताना गिरीश महाजन यांनी मला हात देऊन वर घेतले. तसेच कोणी भाषण करत असतो त्यावेळी आपण त्यांचे ऐकत असतो किंवा आपल्याला पुढे काय बोलायचे याचा विचार करत असतो, त्यामुळे असे काहीही नाही, असे म्हणत भुजबळ यांनी महाजन यांच्यासोबत अबोला असल्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# दिपकेंना भेटल्यानंतर महायुतीत नाराजी

■ पुणे (दै. संध्या)

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीच्या जंतर मंतरवर मोठं आंदोलन उभारलं होतं. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह तरूणांनी तब्बल एक महिना हे आंदोलन केलं. आंदोलन अधिक तीव्र झाल्यानंतर अखेर त्यानंतर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर अभिजीत दिपके हे त्यांच्या मूळ गावी छत्रपती संभाजीनगर येथे परतले, त्यानंतर त्यांना भेटण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये अभिजीत दिपके यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली होती. दरम्यान त्यानंतर शिवसेनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी त्यांच्या घरी जाऊन दिपके यांची भेट घेतली. मात्र या भेटीवरून आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चांगलेच नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. "अभिजीत दीपके यांची, बच्चू कडू यांनी भेट घेतली, संजय शिरसाट यांनी भेट घेतली, त्यावरून आता महायुतीत थेट नाराजी झालेली आहे, याच्यावरती काय सांगाल? यावरती रोहित पवारांनी म्हटलं की, आता खरंच ते स्वतःच्या डोक्याने तिथे गेले होते, का एकनाथ शिंदे साहेबांनी त्यांना पाठवलं होतं, नंतर नाराजी व्यक्त केली, हे आपल्याला तिथे सांगता येणार नाही, पण राहिला प्रश्न अभिजीत दीपके यांचा... तर ते ना महायुतीच्या कुठल्या पक्षामध्ये, ना भाजपमध्ये जाणार आहेत, त्यामुळे काहीही, कितीही प्रयत्न केला, तर ते त्या महायुतीच्या विचाराबरोबर तिथे काम करतील असं मला तरी वाटत नाही, असंही पुढे रोहित पवारांनी म्हटलं आहे.

# एफडीए कर्मचाऱ्यांची मंत्री झिरवाळांकडे तक्रार

■ मुंबई (दै. संध्या)

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागातील धडक कारवायांमुळे चर्चेत असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी प्रथमच विभागातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवर सविस्तर भूमिका स्पष्ट केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेतील काही कर्मचाऱ्यांनी कामाचे तास, सुट्ट्या आणि कार्यालयीन वेळेबाबत मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र, प्रयोगशाळेचे काम आणि सामान्य कार्यालयीन कामकाज यात मूलभूत फरक असून, लॅब २४ तास कार्यरत ठेवण्यासाठी शिफ्ट पद्धती अपरिहार्य असल्याचे तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळेतील तब्बल 29 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीविरोधात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. वाढीव कामाचा ताण, दोन शिफ्टची कार्यपद्धती आणि सुट्टीच्या दिवशीही काम करण्याचे आदेश यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचा दावा या कर्मचाऱ्यांनी केला होता. यावर तुकाराम मुंढे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत पहिल्यांदाच मौन सोडले असून सविस्तर खुलासा केला आहे.

कर्मचाऱ्यांच्या तक्रारीबाबत स्पष्टीकरण देताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए प्रयोगशाळेतील काही कर्मचाऱ्यांनी ही तक्रार केली होती. त्यांची प्रमुख मागणी होती की, त्यांना इतर सर्वसाधारण



कार्यालयांप्रमाणेच १० ते ६ अशी वेळ द्यावी. मात्र, प्रयोगशाळा ही कार्यालयाप्रमाणे चालू शकत नाही. प्रयोगशाळा आणि ऑफिस यामधील फरक जर या कर्मचाऱ्यांना अजूनही समजला नसेल, तर ती आमचीच चूक म्हणावी लागेल."

"माझ्याआधी या लॅब केवळ १० ते ६ या वेळेतच चालत होत्या. त्यामुळे अन्न तपासणीचे रिपोर्ट वेळेवर येत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. त्यामुळे आम्ही मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील लॅबमध्ये सकाळी ७ ते १ आणि दुपारी १ ते रात्री ९ अशा दोन शिफ्टमध्ये काम सुरू केले. मुंबई आणि नागपूरमधील कर्मचाऱ्यांना कोणतीही अडचण नाही, काम सुरळीत सुरू आहे; फक्त संभाजीनगरच्या कर्मचाऱ्यांनीच यावर तक्रार केली आहे," असे मुंढेंनी स्पष्ट केले. "नियमानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याकडून ८ तासांपेक्षा किंवा आठवड्याला ४८ तासांपेक्षा जास्त काम करून घेतले जात नाही, त्यांना एक मिनिटही जादा काम दिलेले नाही," असेही मुंढेंनी स्पष्ट केले.

अनेक ठिकाणी सुधारणेची संधी न देता हॉटेल किंवा रेस्टॉरंटचे थेट परवाने का निलंबित केले जातात, या प्रश्नावरही तुकाराम मुंढेंनी वस्तुस्थिती समोर ठेवली. "दोन महिन्यांत एफडीएने राज्यभरात तब्बल १४०० ठिकाणी तपासण्या केल्या. यापैकी केवळ ११० ठिकाणचे (१० टक्क्यांहून कमी) परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर ३०० पेक्षा जास्त ठिकाणी फक्त 'सुधारणा नोटीस' देण्यात आली आहे. कारवाईनंतर फक्त परवाना निलंबनाचीच चर्चा होते, नोटीस दिल्याची नाही," याकडे तुकाराम मुंढेंनी लक्ष वेधले.

वर्ध्यातील प्रसिद्ध 'गोरस भंडार'ला नोटीस न देता थेट बंद करण्याचे आदेश एफडीएने दिले होते, ज्यावर उच्च न्यायालयानेही आक्षेप घेतला होता. यावर बोलताना तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, "कायद्याच्या दृष्टीने 'गोरस भंडार' ही केवळ एक 'फूड बिझनेस ऑपरेटर' संस्था आहे, कोणतीही 'आयकॉनिक' वास्तू नाही. २०२० ते २०२५ या पाच वर्षांत त्यांच्याकडे चार वेळा तपासण्या झाल्या आणि प्रत्येक वेळी खूप मोठ्या त्रुटी सापडल्या. याआधी त्यांना नोटीस का दिली नाही, हा प्रश्न आहे. पाचव्या वेळीही तीच स्थिती असेल आणि अन्न नागरिकांच्या आरोग्यासाठी हानिकारक असेल, तर कायद्यानुसार परवाना निलंबित करण्याचा पूर्ण अधिकार एफडीए अधिकाऱ्यांना आहे."

# थेट हॉटेलचा परवाना निलंबित का करता?

■ मुंबई (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली एफडीएने भेसळयुक्त अन्नाविरोधात मोर्चा उघडला आहे. त्यामध्ये अनेक मोठ्या संस्थांवर कारवाई करत त्यांचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. मात्र तुकाराम मुंढे हे संबंधित हॉटेल किंवा रेस्टॉरंटला सुधारण्याची नोटीस का देत नाहीत? ते थेट परवानाच का निलंबित करतात? असे प्रश्न अनेकांना उपस्थित होता. याच प्रश्नांवर तुकाराम मुंढे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. तुकाराम मुंढे यांनी एका कार्यक्रमात दिलखुलास गप्पा मारल्या. आयएएस होण्यापासून ते आतापर्यंतचा त्यांचा संघर्ष त्यांनी सांगितला. तसेच एफडीएच्या आता ज्या कारवाया सुरू आहेत त्यामागची भूमिका मुंढेंनी स्पष्ट केली. तुकाराम मुंढे म्हणाले की, "एखाद्या संस्थेवर किंवा हॉटेलवर कारवाई केल्यानंतर त्यासंबंधी एफडीएकडून एक प्रेस नोट काढली जाते. त्यामध्ये फक्त कारवाई करून परवाना निलंबित केल्याचा पार्ट हायलाईट केला जातो. बाकीच्या इतर गोष्टी, म्हणजे कारवाई का करण्यात आली, परवाना निलंबित का करण्यात आला, अशा गोष्टी या दुर्लक्षित केल्या जातात." तुकाराम मुंढे म्हणाले की, "मी एफडीएच्या आयुक्तपदी आल्यापासून दोन महिन्यात 1400 च्या आसपास तपासण्या केल्या आहेत. त्यापैकी 110 ठिकाणचे परवाना निलंबित केले गेले आहेत. 300 पेक्षा जास्त ठिकाणी सुधारणा नोटीस गेल्या आहेत. इतर ठिकाणी काहीच कारवाई झालेली नाही. याचा अर्थ परवाना निलंबित करण्याचे प्रमाण 10 टक्केही नाही.

# संपादकीय

## तिसऱ्या मुंबईच्या तटावर

**पनवेल, पळस्पे, कर्नाळा, चिरनेर, पेण हे तिसऱ्या मुंबईचे तट मानले, तर तिथल्या सद्यस्थितीकडे नियोजनकर्त्यांनी नजर टाकायला हवी.**

मुंबईतून कोकणाकडे जाताना पनवेल पार केल्यावर पूर्वी कर्नाळा हा सुखावह हिरवागार मार्ग असायचा. पाताळगंगा नदी ओलांडताना डावीकडे एक नागमोडी वाट नदीपात्राच्या कडेकडेने आपटा, रसायनी या मनोरम गावांकडे जायची. खारपाड्यातला कमानींचा पूल म्हणजे हमखास वाहतूक कोंडी. तो पार केल्यावर पेणकडे जाईपर्यंत सभोवतीच्या डोंगरांवर पावसाळ्यात काकड्या, श्रावणी भेंडे आणि इतर पावसाळी भाज्यांची लागवड लक्ष वेधून घ्यायची. चिरनेर, हमरापूर, वडखळ परिसरात थोडेफार जंगल, खाजण जमिनी, मिठागरे यांच्या सान्निध्याने किनारपट्टीची चाहूल जाणवायची. आता हा परिसर स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर असून तिसऱ्या मुंबईची बिजे तिथे रोवली जात आहेत. त्या पाऊलखुणा काही टोलेजंग मनोरे, टाऊनशीप यांच्या रूपांत दिसूही लागल्या आहेत. या आव्हानांना नगरनियोजनाच्या कसोटीवर आपण कितपत सज्ज आहोत, हा प्रश्न आहे. कर्नाळा, साई, चिरनेर या परिसरात ही तिसरी मुंबई वसविली जाणार आहे. पेण, खोपोली या परिसरापर्यंतही तिचा विस्तार अपेक्षित आहे. त्यात निवासी संकुलांप्रमाणेच लॉजिस्टिक्स म्हणजेच बंदर-विमानतळ, मालाची आयात-निर्यात-वितरण यांना आधारभूत सेवा यांचे जाळे या परिसरात विणले जाणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतूदरम्यानच्या ३२४ चौरसकिलोमीटर क्षेत्रातील तिसऱ्या मुंबईसाठी सिंगापूरच्या एका कंपनीस बृहद्आराखडा तयार करण्याचे काम दिल्याचेही मध्यंतरी जाहीर झाले आहे. पनवेल, पळस्पे, कर्नाळा, चिरनेर, पेण हे तिसऱ्या मुंबईचे तट मानले, तर तिथले सध्याचे



चित्र काय आहे, याकडे नियोजनकर्त्यांनी एकदा नजर टाकायला हवी. पनवेलमधून रस्त्याने बाहेर पडताना रेल्वेपुलाखाली दर पावसाळ्यात तळे तयार होते. पळस्प्याचे वळण तसेच कर्नाळा घाटाचा प्रारंभ इथे पूर्वी कधी पाणी साचायचे नाही, तिथे आता जलसंचयाची नवी केंद्रे तयार झाली आहेत. खारपाड्याचा पूर्वीच्या कमानीच्या पुलाऐवजी आता दुतर्फा नवे पूल झाले आहेत. परंतु इथे सायंकाळच्या वेळी वाहतूक कोंडीचे नवे स्पॉट तयार झाले आहेत. प्रकल्पांसाठी दगड, मातीची गरज असल्याने सभोवतीचे डोंगर भुईसपाट होत आहेत व चिरनेर रस्ता पावसाळ्यात साचलेले पाणी आणि उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य यांनी ओळखला जाऊ लागला आहे. प्रगतीची काही चिन्हे म्हणजे येथील कंटेनर यार्डांमध्ये देशभरातील माल उतरवला जात आहे. पळस्पे ते कळंबोली, अटलसेतूपर्यंत नैना, पुष्पकनगर तसेच इतर संकुलांचे टोलेजंग मनोरे डोंगराला खेटून उभे आहेत. त्यांच्या मार्गावर फर्निचर, गृहसामग्रीच्या खोपट्यांची गर्दी दाटली आहे. शीळफाटा, डोंबिवली, भिवंडी यांच्याप्रमाणेच येथेही बेशिस्त परिस्थितीचा ज्वालामुखी आपण उभा करणार का? सर्व गोष्टी नव्याने उभ्या राहत असताना त्यांच्यापैकी कुणाची जागा कुठे आहे (इफेक्टिव्ह लँड यूज), पाण्याचा निचरा कसा करायचा, पिण्याचे पाणी कुठून येणार, याचे नियोजन समोर आलेले नाही. या परिसरात नेमके कोणत्या क्षेत्रात रोजगार तयार होणार, त्यासाठी स्थानिकांना प्रशिक्षण देण्याची योजना आहे का, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन केले आहे, त्याबदल्यात कोणत्या पायाभूत सुविधा दिल्या जाणार, असे बरेच प्रश्न धसास लावावे लागतील. हा परिसर रायगड जिल्ह्यात येतो आणि जिल्ह्यातील महनीय खासदार, मंत्री, आमदार हे पालकमंत्रिपद कोणाकडे हवे, या वादात गुरफटलेले आहेत. शेलक्या भाषेत एकमेकांचा समाचार घेत आहेत; परंतु तिसऱ्या मुंबईतील या तटांचे भरभक्कम नियोजन करण्याविषयी त्यांनी अवाक्षरही काढलेले नाही.

## संस्कृत सुभाषित

आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदु:खयो:।
तस्माच्छ्रेयस्करं मार्गं प्रतिपद्येत् न त्रसेत्।।

अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दु:ख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

## आगामी साप्ताहिकी

३ ऑगस्ट २०२६ सोमवार
सूर्याचा ओवा नक्षत्रप्रवेश वाहन : हत्ती

४ ऑगस्ट २०२६ मंगळवार
रामजीबाबा पुण्यतिथी – मोर्शी (अमरावती)

५ ऑगस्ट २०२६ बुधवार
कालाष्टमी

६ ऑगस्ट २०२६ गुरुवार

७ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
जयरामबाबा (भामटी) महाराज पुण्यतिथी – अमरावती

८ ऑगस्ट २०२६ शनिवार

९ ऑगस्ट २०२६ रविवार
कामिका एकादशई
अगस्ती दर्शन
जागतिक आदिवासी दिन

## सुविचार

आत्मसमर्थनाने सद्गुणाची किंमत नष्ट होते.

– वोल्टेर

## उपदेशकथा

### कल्पवृक्ष

एकदा एक माणूस अरण्यात भटकत होता. अतिशय थकल्याने तो एका घनदाट वृक्षाखाली बसला. योगायोगाने तो कल्पवृक्ष होता. तहानेने व्याकुळ झाल्याने त्याच्या मनात आले, या अरण्यात पाणी मिळेल काय? असा विचार करीत असतानाच त्याच्या पुढ्यात जलकुंभ येऊन थांबला. आश्चर्यचकित होऊन पाणी पिऊन त्याने तहान शमविली. काही वेळाने भूक लागल्याने त्याने उत्तम भोजनाची इच्छा केली असता विविध पदार्थांनी व पक्वान्नांनी भरलेले भोजनाचे ताट त्याच्या पुढ्यात आले. भोजन करून तो तृप्त झाला. भोजनानंतर वामकुक्षी घ्यावी असा विचार करताच एक सुंदर शय्या तेथे स्थापित झाली व तो त्यावर सुखनैव विश्रांती घेऊ लागला. झोपून उठल्यावर त्याने पाहिले की, सूर्यकिरणे संधीकाळात पसरली होती. त्याने विचार केला, आता तर संध्याकाळ झाली. या वनात राहाणे आता युक्त नाही, एखादा हिंस्र प्राणी किंवा सिंह येऊन मला खाऊन तर टाकणार नाही ना? असा त्याने विचार करताच एका सिंहाने येऊन त्याच्यावर झडप घालून त्यास खाऊन टाकले.

कथा उपदेश : आपले मनच कल्पवृक्षाप्रमाणे असते. जशी इच्छा तशी फळे!

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २२:००:०५ |
| ३ ऑगस्ट २०२६ | योग:सुकर्मा २१:१२:५६ |
| सोमवार | करण:कौलव ११:०८:४५ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल २२:५४:३१ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क |
| संवत्– १९४८ | चन्द्र:मीन |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – १९ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | सूर्याचा ओवा नक्षत्रप्रवेश |
| तिथि:पंचमी २२:५४:३१ | वाहन : हत्ती |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 1 | | |
| 6 | | | 9 | | | | | |
| 3 | 7 | | 1 | | 6 | 8 | | |
| | 3 | | 4 | 6 | | | | |
| | 8 | 2 | 7 | | 5 | 9 | 4 | |
| | | | | 2 | 1 | | 3 | |
| | | 8 | 6 | | 3 | | 5 | 4 |
| | | | | | 7 | | | 1 |
| | | 1 | | | 8 | | 9 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०२८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 7 | 6 | 5 | 1 | 4 | 9 | 2 |
| 5 | 2 | 1 | 4 | 9 | 7 | 8 | 3 | 6 |
| 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 7 | 5 | 1 |
| 4 | 5 | 2 | 8 | 1 | 6 | 3 | 7 | 9 |
| 3 | 7 | 6 | 9 | 4 | 5 | 2 | 1 | 8 |
| 1 | 9 | 8 | 7 | 2 | 3 | 5 | 6 | 4 |
| 7 | 4 | 3 | 1 | 6 | 8 | 9 | 2 | 5 |
| 6 | 8 | 5 | 2 | 3 | 9 | 1 | 4 | 7 |
| 2 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 6 | 8 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४९२ – कोलंबस भारताच्या शोधासाठी निघाला.
- १६७८ – अमेरिकेत बांधले गेलेले पहिले जहाज ग्रिफोन समुद्रात सोडण्यात आले.
- १७८३ – जपानमध्ये माउंट असामा ज्वालामुखीचा उद्रेक. ३५,००० ठार.
- १८६० – न्यू झीलँडमध्ये दुसरे माओरी युद्ध सुरू झाले.
- १९०० – फायरस्टोन टायर कंपनीची स्थापना.
- १९१४ – पहिले महायुद्ध – जर्मनीने फ्रांसविरुद्ध युद्ध पुकारले.
- १९२३ – कॅल्विन कूलिज अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी.

### राष्ट्रीय

- १९५४ – दादर–नगर हवेली पोर्तुगीज ताब्यातून मुक्त झाली.
- १९८४ – मद्रास विमानतळावरील बॉम्बस्फोटात २४ जण ठार.
- २००४ – भारताचे माजी नौदलप्रमुख ॲडमिरल रामदास यांना मॅगसेसे पारितोषिक मिळाले.

### जन्म

- १७७० – फ्रीडरिक विल्हेम तिसरा, प्रशियाचा राजा.
- १८११ – इलायशा ग्रेव्हस ओटिस, अमेरिकन संशोधक.
- १८५५ – ज्यो हंटर, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८५६ – आल्फ्रेड डीकिन, ऑस्ट्रेलियाचा दुसरा पंतप्रधान.
- १८६७ – स्टॅन्ली बाल्डविन, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
- १८७२ – हाकोन सातवा, नॉर्वेचा राजा.

### निधन

- ११८१ – पोप अलेक्झांडर तिसरा.
- १४६० – जेम्स दुसरा, स्कॉटलंडचा राजा.
- १७९७ – जेफ्री ॲम्हर्स्ट, इंग्लिश सेनापती.
- १९२५ – विल्यम ब्रुस, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

## : SMS :

Doctor: Tumhe kya problem hai?
Patient: Doctor sahab, mujhe bhoolne ki bimari hai.
Doctor: Kab se?
Patient: Kaunsi bimari?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.७ | २३.५ |
| अहमदनगर | ३१ | २३.४ |
| अकोला | ३४.३ | २५.९ |
| अमरावती | ३३.५ | २५.८ |
| बीड | ३८.७ | २६.७ |
| भंडारा | ३५.३ | २६.२ |
| बुलढाणा | ४१.३ | ३०.९ |
| चंद्रपूर | ३८.३ | २६.९ |
| चेन्नई | ४२.४ | ३०.९ |
| नवी दिल्ली | ४२.४ | ३२.७ |
| धुळे | ३४.१ | २५.२ |
| गोंदिया | ३४.८ | २५.८ |
| जळगाव | ३३.७ | २४.९ |
| कोल्हापूर | २७.१ | २३.७ |
| लातूर | ३३.२ | २३.७ |
| मुंबई | ३५ | ३२.५ |
| नागपूर | ३५.४ | २६ |
| नांदेड | ३५.८ | २५.८ |
| नंदूरबार | २९.५ | २४.२ |
| नाशिक | २६.९ | २४ |
| पुणे | २६.५ | २२.८ |
| पंढरपूर | ३५.२ | २४.४ |
| सातारा | ३० | २३.६ |
| सांगली | ३०.७ | २४.१ |
| सोलापूर | ३५.४ | २४.४ |
| वर्धा | ३६.६ | २६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर
आर्थिक लाभ होईल. आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
धंद्यात वाद–विवाद होवू शकतात. कामकाजात व्यत्यय येईल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
नवीन कार्य हाती घ्याल, बिघडलेले संबंध चांगले होवून प्रसन्नता वाटेल. अभ्यासाची आवड लागेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
परिवारात केलेल्या कामावर चर्चा होईल. खर्चावर नियंत्रण ठेवा. मोठ्यांचा मान ठेवाल.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
मन लावून काम केल्यास धंद्यात वाढ होईल. घाईगडबडीने कामे करू नका.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व
आर्थिक अडचणी, कौटुंबिक सुख मिळेल. वाहन हळू चालवा. घाईगडबडीने कामे करू नका.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
प्रसन्नता वाटेल, आर्थिक लाभाची शक्यता महत्वाच्या कामांसाठी खर्च होईल.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पूर्व
व्यक्तिगत जीवनातील चिंता दूर होतील. व्यवसायात वाढ होवून आनंद मिळेल. वाहन हळू चालवा.


**सिंह :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
पूर्वी केलेल्या कामाचे फळ मिळेल. लाभ, मान–सन्मानामध्ये वाढ होईल.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर
सामाजिक कार्यात व्यापून जाल, धंद्यात नवीन योजना हाती घ्याल, मुलांच्या रोजगाराची चिंता राहील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
खर्च वाढवू नका. मन लावून काम केल्यास आपल्या कामात वाढ होईल.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : उत्तर
सामाजिक कार्यात मग्न रहाल. नोकरीमध्ये केलेल्या कामाची किंमत, महत्त्व वाढेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२९



### आडवे शब्द

१. कोकणाला तडाखा देऊन गेलेले चक्रीवादळ
४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
८. यजमान
१०. अतर्क्य गोष्ट घडणे
११. जादू
१३. संरक्षणकर्ता
१४. वाईट इच्छा
१५. मुंबईचा घरगडी
१६. पवन
१७. अरण्य, जंगल
१८. शरीर,२०. गाय
२१. युवती
२२. टीका, समीक्षा करणारा, २५. रत्न
२७. मनात साठवलेल्या अभद्र गोष्टी (ला.)
२८. एक मिश्र धातू
३०. प्रतिष्ठित
३२. पायाला भेगा पडण्याचा रोग
३४. चिंतन
३६. वाणी, बोलणे
३८. मूळ आधार
३९. घटस्फोट
४०. निमग्न, गुंग
४२. ललाट
४३. जन्म–मृत्यू
४५. खूपच छान!
४७. शहर
४८. बारा वर्षांचा काळ
५०. टिकून रहाणे
५१. स्तुती करण्याजोगे
५३. आरोप
५४. पूजेचे ताट
५६. चित्रपट–नाटक इ.ची गोष्ट
५८. समूळ नाश
५९. मंत्रिमंडळ
६२. मेहेरबानी
६३. अंड्यातील पिवळा भाग
६५. भाजी चिरण्याचे साधन
६६. मोठे उथळ ताट
६७. धमकी
६९. गुंडी (इंग्रजी)
७०. धन्यवाद
७२. तात्काळ
७३अ. विश्व
७४. वस्ती
७४अ. तबस्सुमप्रमाणेच 'सदाहरित' अभिनेत्री --- जलाल
७५. रवाळ

### उभे शब्द

१. खळबळजनक
२. मागणारा
३. दारूचा एक प्रकार
४. अनुमती
५. सजावट करणारा
६. कोवळी फांदी
७. केर
८. तंतुवाद्य वाजवताना बोटात घालण्याचे तारेचे साधन
९. पत्त्यातील जोडपे
९अ. घरगुती पिठाची चक्की
१२. तिबेटी धर्मगुरु
१६. मुंग्याचे घर
१९. वेदना
२१. अंधार (संस्कृत)
२३. अंजनाचा एक प्रकार
२४. चांदी
२६. नमन
२७. एक सुगंधी वनस्पती
२९. वडील
३१. सावली
३२. छातीतील दाह
३३. गाड्या उभ्या ठेवण्याची जागा
३४. असह्य वेदना
३५. मान खाली घातलेला
३७. हालचालीवर ठेवलेली नजर
३९. पुष्कळ
४१. पुत्र, मुलगा
४४. नंतर
४६. च्या साठी
४९. बिल्ला
५२. रूचीहीन
५३. आपला–परका असा भेद
५५. मोठे (डोळे), ओबडघोबड
५७. दृष्टीभेट
५८. भांडण लावणारा मुनी
६०. सुट्टीचा दिवस
६१. शेती म्हणजे शेतकऱ्यासठी – आई
६४. कीर्तनकार
६६. गुणाकार
६८. सहाय्य
६९. चिनीमातीचे उभट पात्र
७१. पृथ्वी
७२अ. शाहिराचे वाद्य
७३. हिंदीत साधा, सालस

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२८ चे उत्तर

आडवे उत्तर १.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

उभे उत्तर : १.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## विठूनामाच्या गजरात दुमदुमला सूर्यदत्त नॅशनल स्कूलचा परिसर

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे : ज्ञानोबा माउली-तुकाराम, जय हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल, असा विठूनामाचा गजर आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर करीत सूर्यदत्त नॅशनल स्कुलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा संस्कार चिमुकल्या विद्यार्थ्यांवर व्हावा, त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने, अभंगांच्या सुरांनी आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीची वृंदावने, हातात भगवे पताके, टाळ-चिपळ्या आणि विठूनामाचा अखंड गजर यामुळे शाळेच्या परिसरात पंढरीच्या वारीचे जिवंत चित्र साकार झाले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या अभंग, भक्तिगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालक व शिक्षकांची मने जिंकली.

## कलाकेंद्र मालकाच्या अंगरक्षाकाकडे गावठी कट्टे सापडल्याने खळबळ

**पुणे : दैनिक संध्या**

सध्या दौंड तालुका एन केन मार्गाने राज्यभर गाजले जात असतानाच मागील काही दिवसांपूर्वी यवत पोलिसांनी बेकायदा अग्निशस्त्र गावठी कट्टे बाळगणाऱ्या विरोधात धडक दोन कारवाई करण्यात आली.याएका कारवाईमध्ये वाखारी आणि चौफुला - बोरिपारधी परिसरात खुलेआम गावठी कट्टे बाळगल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर केडगाव पोलिसांनी त्यावर कारवाई केली होती मात्र त्यातून काही आरोपी फरार झाले असल्याची चर्चा नागरिक करत होते. त्याठिकाणी असणारे पोलीस अधिकारी यांनी त्या आरोपीना पकडले का? त्या फरार असणाऱ्या आरोपींना सवलत दिली का? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. अश्याच प्रकारच्या यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भांडगाव येथे स्थानिक गुन्हे शाखा आणि यवत पोलिसांनी संयुक्त कारवाई करत तिघांना अटक केली होती. त्यांच्या ताब्यातून तीन अवैध गावठी पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे आणि एक बलेनो कार असा एकूण ५ लाख ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या सुचनेवरून पोलीस ठाणे हद्दीतील अग्निशस्त्र गावठी कट्टे शोधून कारवाई करण्याची मोहीम पोलिसांनी हाती घेतली होती. यामध्ये भांडगाव ता. दौंड येथील सोनाक्षी मंगल कार्यालयासमोरील परिसरात सापळा रचून पोलिसांनी नंबर नसलेली पांढरी बलेनो कार अडवली होती.त्यातून झडतीदरम्यान त्या आरोपीच्या ताब्यातून प्रत्येकी एक गावठी पिस्तूल व एकूण १५ जिवंत काडतुसे आढळून आली.यवत पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला मात्र त्यांनी ही शस्त्रे कोठून आणली व ती बाळगण्यामागील उद्देश काय होता? याची देखील सखोल चौकशी करणे गरजेचे असल्याचे नागरिक बोलत आहे. यामध्ये असणाऱ्या आरोपी हे वाखारी येथील राज्यभर काही घटनांनी गाजलेले कलाकेंद्र चालक यांच्या अंगरक्षक असणाऱ्या इसमकडे देखील गावठी कट्टे सापडले असल्याची चर्चा परिसरात चांगलीच रंगली आहे. मागील वर्षभरपूर्वी देखील अश्याच कलाकेंद्र मध्ये उलट सुलट घडामोडी घडून राज्यभर दौंड तालुक्याचे नाव बदनाम झाले होते. आता देखील आपल्याकडे काम करणाऱ्या व्यक्तीकडे गावठी कट्टे अग्नीशस्त्र सापडलं असल्याने पुन्हा एकदा चौफुला बोरिपारधी आणि वाखारी येथील कला केंद्र ही अवैध शस्त्र बाळगून दहशत करण्याची ठिकाणे बनली तर नाहीत ना? का या केंद्रवर अवैध शस्त्र यांची तस्करी तर होत नाही ना?असा देखील सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहे. याठिकाणी येणारे हाऊशे लोक, गुन्हेगारी प्रवृतीचे लोक यांच्याकडून याठिकाणी खुलेआम शस्त्र काढून हवेत मिरवले गेले असल्याच्या घटना देखील घडल्या असून याबाबत मात्र पोलीस प्रशासनाला माहिती कशी मिळत नाही. का अश्या घडलेल्या घटना दाबल्या तर जात नाही ना.का जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. आत्तापर्यंत या ठिकाणी किती गावठी कट्टे आणि किती जाणावर गुन्हे दाखल झाले असून त्यांचे पुढे काय झाले याबाबत देखील नागरिक दबक्या आवाजात बोलताना पाहायला मिळत आहे. मात्र ही कलाकेंद्र म्हणजे गावठी कट्टे सर्रास मिळण्याची आणि तस्करीचे केंद्र तर बनले नाही ना? यामुळे पुन्हा भविष्यात याठिकाणी गोळीबार आणि रक्तरंजित घटना घडल्या जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. याबाबत नागरिकांच्यातून वर्तवण्यात येत असून त्या आधीच कला केंद्र परिसरात जर असे प्रकार घडले तर त्याच्या मालकावर देखील गुन्हे दाखल करून परवाना रद्द करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## पावसात नदी पात्रात उतरून वीजपुरवठा केला सुरळीत

**पुणे : दैनिक संध्या**



महावितरण कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि धाडसाचे एक कौतुकास्पद उदाहरण जुन्नर तालुक्यात समोर आले आहे. मुसळधार पाऊस आणि पुराचा धोका असतानाही, वीज कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मीना नदीच्या पात्रात उतरून तुटलेल्या वीजवाहिन्या दुरुस्त केल्या आणि वीजपुरवठा यशस्वीपणे सुरळीत केला आहे. महावितरणच्या या कर्तव्य तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. २३ जुलै २०२६ रोजी जुन्नर पश्चिम भागात झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळामुळे आपटाळे शाखा कार्यालयांतर्गत येणाऱ्या मौजे सोनावळे (निगळे वस्ती) येथील लघुदाब वाहिनीच्या तारा तुटून थेट मीना नदीच्या पात्रात पडल्या होत्या. नदीला पूर आल्यामुळे आणि पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्याने सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ काम करणे शक्य झाले नव्हते. त्यातच पुढील काही दिवस या भागात सलग पाऊस सुरू असल्याने दुरुस्तीच्या कामात मोठे अडथळे येत होते. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी आपटाळे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी रविवारी (२६ जुलै) भर पावसात मोहीम हाती घेतली. पाण्याचा प्रवाह सुरू असतानाही कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने अत्यंत धाडसाने नदी पात्रात प्रवेश केला. वाहत्या पाण्यातून तुटलेल्या तारा बाहेर काढून, त्या व्यवस्थित ओढून रविवारीच या परिसराचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. नैसर्गिक आपत्ती आणि आव्हानात्मक परिस्थितीतही महावितरणचे कर्मचारी अखंडित सेवा देण्यासाठी सदैव तत्पर असतात, हेच या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# महाविद्यालय, बारामती व द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया' पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार

■ **पुणे (दै. संध्या)**

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती आणि 'द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया' (ICSI), पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) संपन्न झाला. या करारामुळे महाविद्यालयात सीएस स्टडी सेंटर सुरू होत असून, विद्यार्थ्यांना कंपनी सेक्रेटरी (CS)


या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दर्जेदार मार्गदर्शन व प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या सामंजस्य करारावर ICSI पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएस. विशाल साळुंके आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारामुळे महाविद्यालयात सीएस फाउंडेशन अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन वर्ग, तज्ज्ञांचे व्याख्यान, करिअर समुपदेशन, अभ्यास साहित्य, परीक्षा मार्गदर्शन तसेच ICSI च्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित केला जाणार आहे.

बारामती व परिसरातील विद्यार्थ्यांना पुणे किंवा इतर महानगरांमध्ये न जाता स्थानिक स्तरावरच कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमासाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळणार असल्याने या उपक्रमाचा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने व्यावसायिक शिक्षणाला चालना देण्यासाठी घेतलेला हा महत्त्वपूर्ण पुढाकार असून कंपनी सेक्रेटरी या प्रतिष्ठित व्यावसायिक क्षेत्राकडे वाटचाल करण्यासाठी नवे दालन खुले झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य (Industry Academia Collaboration) अधिक



बळकट करण्याच्या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.हा सामंजस्य करार घडवून आणण्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता व वाणिज्य विभागप्रमुख, डॉ.निरंजन शहा तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सीएस. हुसेना हसनैन यांनी विशेष प्रयत्न केले. या प्रसंगी ICSI, पुणे चॅप्टरचे सदस्य सीएस. हृषीकेश वाघ, प्रा. (प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस) सीए.शंकरमणी, रजिस्ट्रार श्री.अभिनंदन शहा, वरिष्ठ विभागातील डॉ.विवेक बळे, डॉ.श्रीदेवी नकाते, कनिष्ठ विभागातील वाणिज्य शाखेचे समन्वयक श्री.रमेश गोसावी तसेच वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव श्री. मिलिंद शाह (वाघोलीकर) तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या. या सामंजस्य करारामुळे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात चार्टर्ड अकाउंटंट्स (सी.ए.) घडविण्याबरोबरच कंपनी सेक्रेटरी (सी. एस.) घडविण्याच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल उचलले आहे.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन



डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्याजयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस समाजकल्याण आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ -मुंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वारगेट येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास श्रीमती मुंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बार्टीचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, रवींद्र कदम, समाजकल्याणचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विनम्र अभिवादन

■ **पुणे (दै. संध्या)**

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ व जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी दीप्ती चवधरी म्हणाल्या की, "लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याची लढाई जहालवादी करून या देशाच्या स्वातंत्र्यामध्ये बहुमूल्य योगदान दिले. त्याचप्रमाणे दीड दिवस शाळेत जाऊन अण्णाभाऊ साठे यांनी प्रचंड मोठे साहित्य निर्माण करून सामाजिक चळवळीला दिशा दिली. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा रशियामध्ये सर्व प्रथम गाणारे अण्णाभाऊ साठे यांना त्रिवार अभिवादन." यावेळी महिला काँग्रेस अध्यक्षा स्वाती शिंदे, चंद्रशेखर कपोते, राहुल वंजारी, समद शेख, राजाभाऊ कदम, गुलामहुसेन खान, बबने गोल्डे, गणेश गुगळे, नरेश आवटे, डोंगरे, सुरेश नांगरे, फैय्याज शेख, संजय डोंगरे, पोपट पाटोळे आदी उपस्थित होते.



## वनप्लसने सादर केला एनढ़एक्स

अनेक दिवसांची पॉवर, रोजच्या वापरासाठी बनलेला

■ **पुणे (दै. संध्या)**

ग्लोबल टेक्नॉलॉजी ब्रँड वनप्लसने आज वनप्लस एनढ़एक्स लॉन्च केला आहे. एन सीरिजमध्ये विस्तार करताना हा स्मार्टफोन स्टाईल, विश्वासार्हता आणि ऑल-राउंड पॉवरच्या आजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. 7,000एमएएच मेगा बॅटरी, अपडेटेड डिझाइन आणि दीर्घकाळ टिकणारा स्मूद परफॉर्मन्स यांचा संगम करून हा फोन रोजच्या वापरासाठी आदर्श साथीदार ठरतो.

सेगमेंटमध्ये आघाडीवर असलेल्या 7,000एमएएच बॅटरीसह एनढ़एक्स एका चार्जवर तब्बल 2.5 दिवसांचा वापर देते. यात 20.56 तास व्हिडिओ स्ट्रीमिंग, 133.56 तास संगीत, 25.04 तास सोशल स्क्रोलिंग किंवा 759.13 तास स्टँडबायचा समावेश आहे. अगदी 1% चार्ज असतानाही, अल्ट्रा पॉवर सेव्हिंग मोड आवश्यक फंक्शन्स चालू ठेवतो आणि 0.54 तास कॉल्स, 7.59 तास स्टँडबाय किंवा 0.22 तास नेव्हिगेशनची सुविधा देतो. एनढ़एक्स दीर्घकालीन विश्वासार्हतेसाठी खास डिझाइन केलेले आहे. ही बॅटरी 1,600 चार्जिंग सायकल्स आणि तब्बल सहा वर्षांच्या हेल्थसाठी रेटेड आहे. सहा वर्षांनंतरही ती 80% पेक्षा जास्त क्षमता टिकवून ठेवते. अत्यंत तापमान, ओव्हरचार्जिंग, ड्रॉप्स आणि कॉम्प्रेशनपासून संरक्षण देणाऱ्या चार लेयर्ससह ही बॅटरी सुरक्षित आहे. बायपास चार्जिंग दीर्घकाळ वापरात उष्णता कमी करते, रिव्हर्स चार्जिंग सुसंगत अॅक्सेसरीजना पॉवर देते, तर नाईट चार्जिंग मोड झोपेच्या रूटीननुसार चार्जिंग अॅडजस्ट करून ओव्हरचार्जिंग टाळतो. एनढ़एक्स एंट्री स्मार्टफोन सेगमेंटमध्ये उंचावलेलं डिझाइन घेऊन येतो. गार्नेट-इन्स्पायर्ड बर्गंडी रेड आणि अॅक्वामरीन-इन्स्पायर्ड आईस ब्लू या रंगांमध्ये उपलब्ध असलेला हा फोन, रिफाइंड फिनिशसह स्वच्छ व्हर्टिकल कॅमेरा लेआउट आणि मऊ गोलाकार किनारी देतो.

## पनवेलच्या इतिहासात प्रथमच शासकीय स्तरावर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

■ **पुणे (दै. संध्या)**

पनवेल :(साबीर शेख)- पनवेल महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती शासकीय स्तरावर अत्यंत दिमाखात साजरी करण्यात आली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित या भव्य सोहळ्याची संकल्पना सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी मांडली होती. त्यांच्या या प्रस्तावाला महापौर नितीन पाटील यांची तत्काळ मान्यता मिळाली, तर आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नियोजन तातडीने ,सुंदर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्यानंतर हा ऐतिहासिक उपक्रम साकार झाला.

कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांनी पोवाडे, शाहिरी, गीत आणि नाट्यमय सादरीकरणातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे प्रभावी चित्रण केले. त्यांच्या कार्याचा, साहित्याचा, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचा, कामगार चळवळीतील सहभागाचा आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या संघर्षाचा प्रभावी उलगडा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान शाहिरी गीतांच्या तालावर उपस्थित अनुयायी आणि रसिकांनी उत्स्फूर्तपणे नृत्य करत जल्लोष केला. यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले,"जयंती म्हणजे केवळ जन्मदिन साजरा करणे नव्हे, तर त्या महामानवांनी समाजाला दिलेल्या विचारांचा जागर करण्याचा दिवस आहे." अण्णाभाऊ साठे यांनी अवघ्या दीड दिवसांच्या औपचारिक शिक्षणाच्या बळावर २७ भाषांमध्ये साहित्य निर्माण करून भारताचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले. अशी व्यक्तिमत्त्वे निर्माण होत नसतात, तर नियती त्यांना समाजाच्या कल्याणासाठी घडवत असते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तसेच ही जयंती तहयात दरवर्षी अधिक व्यापक स्वरूपात साजरी केली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच पनवेल महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच शासकीय स्तरावर त्यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील व आयुक्त तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या वर्षी प्रथमच आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचू शकली नाही, याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. मात्र, पुढील काळात सर्व महामानवांच्या विचारांचा गौरव करणारे असे प्रेरणादायी कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करून पनवेलच्या सांस्कृतिक इतिहासात नवी भर घालण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, कलाकार, अधिकारी, समाजबांधव आणि उपस्थित श्रोत्यांचे त्यांनी आभार मानले.

# घनकचरा व्यवस्थापन कार्यपद्धती, नियोजनामध्ये स्पष्टता हवी

■ **पुणे (दै. संध्या)**

घनकचरा व्यवस्थापनासाठी पुणे महानगरपालिकेने कंत्राट देण्यास आमचा विरोध नाही; मात्र, सदर कंत्राटाची कार्यपद्धती, नियोजनातील त्रुटी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत असलेला स्पष्टतेचा अभाव याला आमचा विरोध आहे. त्यामुळे कार्यपद्धतीत स्पष्टता, नियोजन ठेवून कंत्राटदाराने आधी स्पष्ट आराखडा सादर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी केली. नुकत्याच (३० जुलै) झालेल्या पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नव्या कंत्राटावरून मोठा गदारोळ झाला होता. याबाबत चव्हाण यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. काकासाहेब चव्हाण म्हणाले, "पुणे शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा संकलित केला जात असला, तरी कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी महानगरपालिकेकडे स्पष्ट, सक्षम आणि व्यवहार्य कार्यपद्धती उपलब्ध नसल्याचे दिसून येते. माझ्या प्रभाग क्रमांक ३३ मध्ये कचरा उचलला गेला, तर प्रक्रिया केंद्रांमध्ये कचरा स्वीकारला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. अशा परिस्थितीत केवळ कोट्यवधी रुपयांचे कंत्राट देऊन शहर स्वच्छ होणार नाही. सर्वप्रथम कचऱ्याची प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट नेमकी कशी लावली जाणार, याचा स्पष्ट आराखडा नागरिकांसमोर आणि लोकप्रतिनिधींसमोर ठेवणे आवश्यक आहे." या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ कचऱ्याचे काय होणार, याबाबतही कंत्राटदार किंवा



प्रशासनाने कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तसेच हे कंत्राट सुरुवातीला केवळ तीन महिन्यांसाठी देण्यात येत असून, त्यानंतर ते सुरू राहिले नाही तर या कंपनीत काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंत्राटदाराने शहरातील स्वच्छता व्यवस्थापनाचा संपूर्ण आराखडा, तांत्रिक क्षमता, प्रक्रिया व्यवस्था आणि कामकाजाची पद्धत याबाबत सर्व नगरसेवकांसमोर सविस्तर सादरीकरण करावे, अशी आमची मागणी आहे. मात्र या मागणीलाही प्रशासन आणि कंत्राटदाराकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही, असे चव्हाण यांनी नमूद केले. निविदेमध्ये अनेक तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय त्रुटी आहेत. त्यामुळे निविदेची फेरतपासणी आवश्यक आहे. संबंधित विभाग, क्षेत्रीय कार्यालय, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त पाहणीतून प्रत्येक रस्त्याचे प्रत्यक्ष मोजमाप करून अंतिम लांबी निश्चित करण्यात यावी. यांत्रिक झाडण होणाऱ्या रस्त्यांचा समावेश मानवी झाडणकामातून वगळावा. अनेक प्रभागांमध्ये समान रस्त्यांची पुनरावृत्ती झाल्याने रस्त्यांची एकूण लांबी कृत्रिमरीत्या वाढल्याचे दिसून येत आहे.

खाजगी गृहनिर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यांचा समावेश कायदेशीरदृष्ट्या आणि प्रत्यक्ष आवश्यकतेच्या दृष्टीने तपासण्यात यावा. यामुळे महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांची बचत होऊ शकते. अन्यथा अतिरिक्त मनुष्यबळ, वेतन, वाहनव्यवस्था, पर्यवेक्षण आणि प्रशासकीय खर्चामुळे सार्वजनिक निधीवर अनावश्यक आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे, असे काकासाहेब यांनी नमूद केले. या निविदेमध्ये महानगरपालिकेतील कायमस्वरूपी झाडणकामगारांच्या सेवा, जबाबदाऱ्या, कार्यक्षेत्र आणि भविष्यातील भूमिकेबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. भविष्यात स्वच्छता व्यवस्थेचे संपूर्ण खासगीकरण झाल्यास त्यांच्या सेवा, हक्क, रोजगाराची सुरक्षितता, पदनियोजन आणि अनुकंपा नियुक्तीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या हिताचे संरक्षण करणारे स्वतंत्र धोरण तातडीने जाहीर करावे. सार्वजनिक निधीचा काटेकोर वापर सुनिश्चित करण्यासाठी रस्त्यांची लांबी, मनुष्यबळ, वाहनांची संख्या, सेवा शुल्क, प्रशासकीय खर्च आणि इतर सर्व आर्थिक बाबींचे स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण करूनच निविदेला अंतिम मंजुरी द्यावी, अशी भूमिका काकासाहेब चव्हाण यांनी मांडली.

## थोडक्यात पण महत्वाचे

### मुंबईत लपून बसलेला उत्तर प्रदेशातील ‘गँगस्टर’ जेरबंद; पोलिसांची कारवाई

**मुंबई : दैनिक संध्या**

मुंबईत बनावट ओळख लपवून वास्तव्यास असलेल्या उत्तर प्रदेशातील गँगस्टर कायद्याअंतर्गत फरार असलेल्या एका टोळीप्रमुखाला यलो गेट पोलिसांनी अटक करून उत्तर प्रदेशपोलिसांच्या ताब्यात दिले आहे. यलो गेट पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला ३० जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार उत्तर प्रदेशातील सराईत गुन्हेगार निशांत राजेश सिंह (वय २३) हा दक्षिण मुंबईतील एका हॉटेल परिसरात संशयास्पदरीत्या वावरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस निरीक्षक निलेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तातडीने सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान निशांत सिंह याने स्वतःची खरी ओळख लपविण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तांत्रिक तपास आणि सखोल पडताळणी केल्यानंतर तो उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याविरुद्ध सीतापूरमध्ये जबरी चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असून, उत्तर प्रदेश गँगस्टर्स आणि समाजविघातक कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९८६ अंतर्गतही त्याच्यावर गुन्हा नोंद असल्याचे उघड झाले. यानंतर यलो गेट पोलिसांनी उत्तर प्रदेशातील अटरिया पोलिस ठाण्याशी संपर्क साधून आरोपीची माहिती, छायाचित्रे आणि इतर तपशिलांची पडताळणी केली. त्यामध्ये निशांत सिंह हा संबंधित प्रकरणातील मुख्य आरोपी आणि टोळीचा प्रमुख असल्याची पुष्टी झाली. त्याचा शोध घेण्यासाठी उत्तर प्रदेश पोलिसांचे पथक मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती मिळाल्यानंतर १ ऑगस्ट रोजी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला सीतापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

### चौकशीपूर्वी आस्थापनांची नावे जाहीर करण्याची ‘नेम अ‍ॅण्ड शेम’ पद्धत थांबवावी

**मुंबई : दैनिक संध्या**

हॉटेल व्यावसायिक संघटनांनी एफडीएच्या कारवाईत कायदेशीर प्रक्रियेचे पालन व्हावे, यासाठी पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि एफएसएसएआयकडे हस्तक्षेपाची मागणी केली आहे. किरकोळ त्रुटींवर त्वरित कारवाईऐवजी सुधारण्याची संधी द्यावी. चौकशीपूर्वी आस्थापनांची नावे जाहीर करण्याची ‘नेम अ‍ॅण्ड शेम’ पद्धत थांबवावी. परवाना निलंबन / रद्द करण्यापूर्वी १४ दिवसांची सुधारणा नोटीस द्यावी. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार कारवाई व्हावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. एफडीएच्या तपासण्या, कारवाईला विरोध नाही. मात्र, त्रुटी दुरुस्त करण्याची संधी न देता परवाने निलंबित किंवा रद्द करणे गंभीर असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. संबंधित घटकांशी सल्लामसलत न करता आणि प्रक्रियात्मक न्यायाचे पालन न करता करण्यात येणारी अशी कारवाई ‘ईज ऑफ डुईंग बिझनेस’ या तत्त्वाच्या विरोधात असून, नियामक कारवाईपूर्वी प्रतिनिधी संस्थांशी चर्चा करण्याचा कायद्याचा उद्देशही त्यामुळे बाधित होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. चौकशीपूर्वी आस्थापनांची नावे जाहीर करण्यामुळे गुंतवणूकदार व ग्राहकांचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार व कायदेशीर प्रक्रियेचे पालन करूनच कारवाई व्हावी, अशी मागणी आहे. यामुळे ग्राहकांचे संरक्षण व प्रामाणिक उद्योजकांचे हित या दोन्ही गोष्टींचा समतोल राखला जाईल, असे संघटनांनी स्पष्ट केले. एफएसएस कायद्याच्या कलम ३२ नुसार अन्न व्यवसाय चालकांना परवाना निलंबित किंवा रद्द करण्यापूर्वी १४ दिवसांची ‘सुधारणा नोटीस’ द्यावी, अशी संघटनांची मागणी आहे. प्रत्येक प्रकरणात या वैधानिक संरक्षणाचे पालन करावे, अशी संघटनांची मागणी आहे. २३ जूनच्या एफडीएच्या अनुपालन आदेशातील काही तरतुदी एफएसएस कायदा आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांशी विसंगत आहेत. हा आदेश जारी करण्यापूर्वी कायद्यात अपेक्षित असलेली हितधारकांशी सल्लामसलत करण्यात आली नसल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

### आरोपीची धिंड; मुख्य सचिव, ११ अधिकाऱ्यांना नोटीस

**मुं बई : दैनिक संध्या**

पुण्यातील एका आरोपीला गजबजलेल्या रस्त्यावर अपमानित करून, उठाबशा काढायला लावून धिंड काढल्याप्रकरणी राज्याचे मुख्य सचिव व पुणे पोलिस आयुक्तांसहित ११ पोलिस अधिकाऱ्यांना राज्य मानवाधिकार आयोगाने प्रतिवादी करून नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांनी ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीत आपली बाजू मांडावी, असे निर्देश आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्या. अनंत बदर यांनी दिले आहेत. पुण्यातील लक्ष्मीनगर पोलिस स्थानकातील आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याची रस्त्यात धिंड काढून त्याला अपमानास्पद वागणूक देण्यात आली, आक्षेपार्ह भाषेत हिणवले, उठाबशा काढायला लावल्या, सर्वांसमोर अपमानित करण्यात आले व जाहीर माफी मागण्यास भाग पाडण्यात आले, या प्रकाराबाबत स्वप्नील जाधव व तानाजी कारचेंनी तक्रार केली होती. आरोपीचा सार्वजनिक ठिकाणी शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला, असे अहवालावरून दिसून येत असल्याचे मत आयोगाने नोंदवले. याप्रकरणी मुख्य सचिव, पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार, उपायुक्त चिलुमुला रजनीकांत, वरिष्ठ निरीक्षक रवींद्र कदम, शिवाजी विभुते, रविकांत नंदनवार, महेश नलावडे या अधिकाऱ्यांसह अमोल गायकवाड, अमोल वायाळ, भीमराव कांबळे, दत्तात्रय शिंदे, कादिर शेख, सूरज अंबासे या कर्मचाऱ्यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. या पोलिसांविरोधात मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कलम १८ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यास ते जबाबदार ठरू शकतात, असे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि त्याचे संभाव्य परिणाम लक्षात घेता, मुख्य सचिवांना या प्रकरणात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आवश्यक असल्याने आयोगाने मुख्य सचिवांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य शासनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी त्यांना उत्तर दाखल करण्याचे स्वातंत्र्य राहील, असे आयोगाने स्पष्ट केले. पीडित व्यक्तीच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे, त्यांचे उल्लंघन होऊ न देणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी होती, मात्र पुणे पोलिसांनी पीडित व्यक्तीला शारीरिक शिक्षा दिली. मानवी हक्कांच्या उल्लंघनात सहभाग असल्याचे तसेच मानवी हक्कांचे संरक्षण करण्यात निष्काळजीपणा झाल्याचे छायाचित्रांवरून दिसत असल्याचे निरीक्षण आयोगाने नोंदवले, अशी माहिती आयोगाचे निबंधक न्या. विजय केदार यांनी दिली.

### खड्डे असो की भेसळ... कशाला उगाच राग राग करता..?

**नाशिक : दैनिक संध्या**

रस्त्यावर खड्डे पडले म्हणून तुम्ही संताप व्यक्त केला. उगाच या वयात एवढी चिडचिड बरी नव्हे. रस्त्याची, खड्ड्यांची, भेसळीची काळजी घेणारे मिळतील. पण आपल्या तब्येतीची काळजी आपणच घ्यावी लागेल ना..? नाशिकचे खड्डे पाहून आपल्याला वाईट वाटले. मग आता मुंबई ते गोवा प्रवास बिलकुल करू नका... अति दुःखाने आपण मंत्रिपदाचा राजीनामा देऊन टाकाल... गणपतीच्या काळात मुंबईतली चाकरमानी मंडळी कोकणात जातील तेव्हा ते याच रस्त्यावरून जाताना कोणाकोणाचा कसा उद्धार करतात ते बघा. मुंबई-गोवा या प्रवासात त्यांचा ऊर इतका भरून येतो की ते अनेक नेत्यांच्या मातापित्यांची पावलोपावली आठवण काढतात. त्या रस्त्यालादेखील हे सवयीचे झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गावर एक ग्रंथ लिहून पूर्ण होईल, असे उगाच नितीन गडकरी म्हणाले नाहीत. नाशकातले खड्डे बघून तुम्हाला गिरीश महाजन आठवले. पण कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक नगरीत ३५ ते ४० हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. अवघे नाशिक चकाचक होईल. त्याचा फायदा स्थानिक आमदार म्हणून तुम्हालाच होणार आहे.

# इंडोनेशियात प्रवासी बोटीला लागली भीषण आग



■ इंडोनेशिया(दै. संध्या)

मदुरा बेटाजवळ रविवारी एका प्रवासी बोटीला भीषण आग लागली. या आगीत आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला असून अद्याप ४१ जण बेपत्ता आहेत. या दुर्घटनेनंतर मोठ्या प्रमाणात सर्च आणि रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. या प्रवासी बोटीत क्रू मेंबर्ससह २७१ जण प्रवास करत होते. या घटनेत २२५ जणांना सुरक्षित वाचवण्यात आले असून बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे.

ही बोट पूर्व जावा प्रांतातील सुराबायाहून दक्षिण सुलावेसीमधील मकासारकडे जात होती. यावेळी जावाच्या ईशान्य किनाऱ्याजवळील मदुरा बेटाजवळ बोटीला आग लागली. रेस्क्यू ऑपरेशनसाठी या परिसरात अनेक जहाजे तैनात केली आहेत. अधिकारी आसपासच्या सागरी परिसरात बेपत्ता लोकांना शोध घेत आहेत. बोटीला आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप समोर आले नाही. इंडोनेशियात १ वर्षापूर्वीही प्रवासी बोटीला आग लागल्याची जीवघेणी घटना घडली होती. जुलै २०२५ मध्ये उत्तर सुलावेसी प्रांतातील एका प्रवासी जहाजाला आग लागल्याने ३ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेवेळी १५० जणांना सुखरूप वाचवले होते. KM Barcelona 5 नावाच्या या जहाजातून २८० जण प्रवास करत होते. मागील वर्षी १९ जुलैला राजधानी मनाडोच्या सागरी सफारीवेळी जहाजाला आग लागली होती. दरम्यान, २०२५ च्या या घटनेव्यतिरिक्त इंडोनेशियात अनेक फेरींना आग लागण्याच्या आणि सागरी अपघातांच्या घटना पाहायला मिळाल्या आहेत. मे २०२१ मध्ये, टर्नाटेहून निघाल्यानंतर लगेचच मोलुक्का समुद्रात 'केएम कार्या इंदाह' या फेरीला आग लागली. आग लागल्यानंतर प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना समुद्रात उडी मारण्यास भाग पडले. अधिकारी आणि स्थानिक मच्छीमार बोटींच्या मदतीने सर्व १८१ प्रवासी आणि १४ कर्मचाऱ्यांना सुखरूप वाचवण्यात आले. प्रवाशांमध्ये २२ मुलांचा समावेश होता. या अपघातात कोणाचाही मृत्यू झाला नव्हता.

# एकाच सत्रात होणार पेपर, प्रत्येक प्रश्नाला मिळणार अतिरिक्त वेळ

■ पटना (दै. संध्या)

नीट-पीजी २०२६ च्या उमेदवारांना आता दूरच्या परीक्षा केंद्रांवर जाण्याची किंवा ऐनवेळी प्रवासाचे नियोजन करण्याची घाई करावी लागणार नाही. केंद्र सरकारने उमेदवारांच्या सोयीसाठी नवीन नियम लागू केले आहेत. विद्यार्थ्यांना आता घराच्या जवळ परीक्षा केंद्र शोधण्याची, परीक्षा शहराबद्दल आगाऊ माहिती मिळवण्याची, प्रत्येक प्रश्नासाठी अधिक वेळ देण्याची सोय उपलब्ध असेल आणि परीक्षेत पारदर्शकता राखण्यासाठी कडक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जातील.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नीट-पीजी २०२६ परीक्षेच्या पार्श्वभूमीवर हे बदल केले आहेत. या बदलांमागील उद्देश परीक्षा अधिक निष्पक्ष, सुरक्षित आणि पारदर्शक बनवणे, तसेच उमेदवारांवरील ताण कमी करणे हा आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी नीट-पीजी २०२६ च्या तयारीचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना ही परीक्षा कोणत्याही अडचणींशिवाय, सुरक्षित व तंत्रज्ञान-आधारित पद्धतीने घेण्याचे निर्देश दिले. त्यांनी नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस, तांत्रिक टीम आणि इतर एजन्सींसोबत तयारीचा आढावा घेतला आणि उमेदवारांसाठी परीक्षा सोपी व निष्पक्ष करण्याच्या महत्त्वावर भर दिला. यावर्षी NEET-PG 2026 साठी एकूण 273,183 उमेदवारांनी नोंदणी केली असून, ही संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत 12.5 टक्क्यांहून अधिक वाढ दाखवते.

परीक्षा केंद्र निवड प्रक्रियेत सर्वात मोठा बदल करण्यात आला आहे. पूर्वी, उमेदवारांना 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केंद्रे दिली जात होती. आता तसे होणार नाही. नवीन प्रणालीनुसार, उमेदवारांना त्यांच्या परीक्षा केंद्रासाठी त्यांच्या पसंतीची तीन राज्ये निवडावी लागतील. उमेदवारांना त्यांच्या राज्याला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. यामुळे उमेदवारांना त्यांच्या निवासस्थानाजवळ केंद्रे मिळतील याची खात्री करण्यास मदत होणार आहे, असेही सरकारने सांगितले आहे. पूर्वी, उशिरा नोंदणी करणाऱ्या उमेदवारांना अनेकदा जवळची केंद्रे पूर्णपणे भरलेली आढळत असत आणि परीक्षा देण्यासाठी त्यांना दूरच्या राज्यांमध्ये प्रवास करावा लागत असे. आता उमेदवारांना ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या परीक्षेच्या सुमारे तीन आठवडे आधी त्यांच्या नेमून दिलेल्या परीक्षा शहराबद्दल माहिती दिली जाईल, यामुळे त्यांना प्रवास आणि निवासाची व्यवस्था करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. आतापर्यंत, उमेदवारांना शहर आणि परीक्षा केंद्राबद्दलची माहिती अनेकदा परीक्षेच्या काही दिवस आधीच मिळत असे, ज्यामुळे व्यवस्थापकीय आव्हाने आणि अतिरिक्त खर्च निर्माण होत होता.

राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळाने परीक्षेच्या पद्धतीत सुधारणा करून, १८० बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यांची उत्तरे २१० मिनिटांत द्यावी लागतील. गेल्या काही वर्षांत, परिस्थितीमुळे नीट-पीजी परीक्षा दोन सत्रांमध्ये घेतली जात होती, पण आता नीट-पीजी २०२६ परीक्षा एकाच सत्रात घेतली जाणार आहे. मंत्रालयाच्या मते, एकाच सत्रात परीक्षा घेतल्याने सर्व उमेदवारांसाठी समान काठिण्य पातळीचे प्रश्न सुनिश्चित होतील आणि विद्यार्थ्यांचे अधिक निष्पक्ष व पारदर्शक मूल्यांकन होईल.

# सुभाष चंद्रा, गोयंका यांना शेअर बाजारात बंदी

■ पटना (दै. संध्या)

भांडवली बाजार नियामक सेबीने झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेड (झील) कंपनीवर दोन महिन्यांसाठी भांडवली बाजारात सहभागी होण्यास बंदी घातली आहे. तसेच कंपनीचे चेअरमन एमेरिटस सुभाष चंद्रा आणि व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी पुनीत गोयंका यांना एक वर्षासाठी बाजारातून प्रतिबंधित करण्यात आले आहे. हैदराबादमधील कंपनीची जमीन प्रमोटर समूहाशी संबंधित कंपन्यांच्या कर्जासाठी परवानगीशिवाय गहाण ठेवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली.

सेबीने तिघांवर एकूण १.४८ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला आहे. त्यामध्ये झीलवर ३० लाख रुपये, सुभाष चंद्रा यांच्यावर ६० लाख रुपये आणि पुनीत गोयंका यांच्यावर ५८ लाख रुपयांचा दंड आहे. सेबीच्या आदेशानुसार, डिसेंबर २०१८ मध्ये झीलच्या हैदराबाद येथील मालमत्तेची मूळ कागदपत्रे इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स लिमिटेडकडे एस्सेल समूहाशी संबंधित कंपन्यांनी घेतलेल्या कर्जाच्या हमीसाठी जमा करण्यात आली होती.

कर्जाच्या हमीसाठी जमा करण्यात आलेल्या मूळ कागदपत्रांसाठी लेखापरीक्षण समितीची पूर्वपरवानगी घेतली नव्हती व आर्थिक अहवालांमध्येही या व्यवहाराचा योग्य खुलासा केला नव्हता. सेबीने नमूद केले की, सुभाष चंद्रा यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून कंपनीची मालमत्ता वैयक्तिक फायद्यासाठी धोक्यात घातली. हा आदेश तत्काळ लागू झाला असून दंडाची रक्कम ४५ दिवसांत भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.





# २० रुपयांपेक्षाही कमी किंमतीच्या ‘या’ १० शेअर्सचा धमाका !

■ पटना (दै. संध्या)

आपण शेअर बाजारातील कमी किंमतीच्या शेअर्सवर अर्थात 'पेनी स्टॉक्स'वर लक्ष ठेवून असाल, तर ही बातमी खास आपल्यासाठी आहे. शेअर बाजारांतील काही पेनी शेअर्सनी गेल्या ६ महिन्यांत आपल्या गुंतवणूकदारांना बंपर परतावा देत मालामाल केले आहे. यांतील एका शेअरने तर केवळ सहा महिन्यांतच तब्बल १९८ टक्क्यांपर्यंतचा परतावा दिला आहे.

मात्र, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, पेनी शेअर्स जेवढ्या झटपट वर जातात, ते तेवढ्याच झटपट घसरूही शकतात, यामुळे यात गुंतवणूक करण्यापूर्वी योग्य अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

'एसीई इक्विटी'च्या आकडेवारीनुसार, ज्या कंपन्यांचे मार्केट कॅप १००० कोटी रुपयांपेक्षा कमी आहे, शेअर्सची किंमत २० रुपयांपेक्षा कमी आणि दैनंदिन ट्रेडिंग व्हॉल्यूम किमान ५ लाख शेअर्स एवढी आहे, अशा कंपन्यांचाच यात समावेश करण्यात आला आहे. या यादीतील पहिला आणि सर्वाधिक परतावा देणारा शेअर म्हमजे, आरजीएफ कॅपिटल मार्केट (RGF Capital Market)चा. या शेअरने आपल्या गुंतवणूकदारांना गेल्या ६ महिन्यांत तब्बल १९८% एवढा बंपर परतावा दिला आहे... आणखी शेअर्स खालीलप्रमाणे... शेअर बाजारात गुंतवणूकीचा विचार करणाऱ्या लोकांनी केवळ भूतकाळातील परतावा पाहून गुंतवणुकीचा निर्णय घेणे धोक्याचे ठरू शकते. पेनी स्टॉक्समध्ये सहसा कमी लिक्विडिटी, मोठी चढ-उतार (Volatility) आणि मर्यादित आर्थिक माहिती यामुळे मोठा धोका असतो. महत्वाचे म्हणजे, अनेकदा मोठ्या उसळीनंतरही अशा शेअर्समध्ये मोठी घसरण दिसून येते. याच बरोबर, केवळ परतावाच लक्षात न घेता, कंपनीचा व्यवसाय, आर्थिक स्थिती, प्रमोटर होल्डिंग आणि भविष्यातील शक्यतांचेही सविस्तर विश्लेषण करणे आवश्यक आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे

### आर्थिक विवंचनेतून कुटुंबाची आत्महत्या; पतीनंतर पत्नी उपचारादरम्यान मृत्यू

**पिंपरी : दैनिक संध्या**

आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या पिंपरीतील एका कुटुंबातील पत्नी व मुलीचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. काल पतीचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या दुर्दैवी घटनेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पिंपरी येथील करिष्मा ग्लोरी सोसायटीमध्ये राहणारे विनोद पिल्ले (वय ५०), त्यांची पत्नी सिरजा पिल्ले (वय ४५) आणि मुलगी पूर्णिमा पिल्ले (वय १९) यांनी विषारी रसायनाचा धूर घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. या घटनेत विनोद पिल्ले यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता. तर वायसीएम रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना सिरजा पिल्ले आणि पूर्णिमा पिल्ले यांचाही मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे कुटुंब अत्यंत उच्चशिक्षित होते. विनोद पिल्ले यांनी आयआयएम अहमदाबादमधून संगणकशास्त्राचे शिक्षण घेतले होते, तर सिरजा पिल्ले या एका नामांकित शाळेत समन्वयक म्हणून कार्यरत होत्या. कामावर गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी नातेवाईकांशी संपर्क साधला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घटनास्थळी संत तुकाराम नगर पोलिसांना सुसाईड नोट आणि सोडियम नायट्रेट या विषारी रसायनाचा डबा आढळून आला. सुसाईड नोटमध्ये आर्थिक अडचणींमुळे हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे नमूद करण्यात आले असून या घटनेसाठी कोणालाही जबाबदार धरू नये, असे लिहिले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. प्राथमिक तपासात विनोद पिल्ले यांनी ऑनलाइन मागवलेले सोडियम नायट्रेट कोळशावर जाळून त्याचा धूर पसरविल्याचे समोर आले आहे. मोठ्या आर्थिक संकटामुळे या कुटुंबाने तीन वर्षांपूर्वी नेहरूनगर येथील स्वतःचे घर विकले होते. सध्या ते मोरवाडी परिसरात भाड्याच्या घरात राहत होते. या हृदयद्रावक घटनेचा संत तुकाराम नगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### टाटा सॉल्टच्या नावाने बनावट मीठ विक्री; मोशीतील व्यावसायिकावर गुन्हा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी :- प्रसिद्ध टाटा सॉल्ट कंपनीच्या नावाने बनावट मीठ विक्रीसाठी ठेवल्याप्रकरणी मोशी येथील एका व्यावसायिकाविरोधात भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉपीराइट कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून आरोपी अद्याप फरार आहे. याप्रकरणी कृष्णा देवीप्रसाद कनोजिया (वय ५०, रा. मुंबई) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार गोपाल प्रभुरामजी प्रजापत (वय २८, रा. आदर्शनगर, मोशी) याच्याविरोधात कॉपीराइट कायदा कलम ५१ व ६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास मोशी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील तुळशी ट्रेडिंग या दुकानात ही कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान आरोपीने टाटा सॉल्ट कंपनीच्या नावाने बनावट मीठ विक्रीसाठी ठेवले असल्याचे आढळून आले. सदर बनावट उत्पादनाचा वापर केल्यास ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कंपनीच्या स्वामित्व हक्कांचे उल्लंघन करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हा प्रकार केल्याचा आरोप आहे. भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत.रात

### चिंचवडगाव येथे 'माझी प्रवास गाथा' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी :- 'आयुष्य हा एक प्रवास असून तो समरसून केल्यास मानवी जीवनाचे सार्थक होते!' असे विचार ज्येष्ठ साहित्यिक रमेश इनामदार यांनी विरंगुळा केंद्र, चिंचवडगाव येथे रविवार, दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ रोजी व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक शहाजी कांबळे लिखित 'माझी प्रवास गाथा' या सहाव्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना रमेश इनामदार बोलत होते. ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवडचे उपाध्यक्ष गोपाळ भसे, कोषाध्यक्ष अरविंद जोशी, लेखक शहाजी कांबळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. रमेश इनामदार पुढे म्हणाले की, 'गोडसे भटजी यांच्या 'माझा प्रवास' या प्रवासवर्णनाने मराठी साहित्यात या नव्या साहित्यप्रकाराची समृद्ध परंपरा निर्माण झाली. त्यात वास्तवाला प्रतिभाशक्तीची जोड देऊन शहाजी कांबळे यांनी केलेले प्रवासवर्णनपर लेखन त्यांच्या सूक्ष्म अवलोकन अन् निरीक्षण कौशल्याचे प्रत्यय देणारे आहे. विशेषत: आपला देश आणि परदेश यांतील तपशीलवार सांस्कृतिक तफावत नमूद करताना त्यांच्या मनाची संवेदनशीलता पानोपानी जाणवते!' अरविंद जोशी यांनी, 'कांबळे यांची प्रवास गाथा वाचल्यानंतर वाचक नक्कीच प्रवासाला उद्युक्त होतील!' असा विश्वास व्यक्त केला. सुधीर वैद्य यांनी अनावृत पत्रवाचनाच्या माध्यमातून कांबळे यांच्या वैविध्यपूर्ण लेखनाची आस्वादक समीक्षा केली; तर मुग्धा पुजारी यांनी, 'प्रवासवर्णन म्हणजे मानवी संस्कृतीचे जिवंत चित्रण असते!' असे मत मांडले. मंगेश उंबराणी यांनी मैत्रीदिनानिमित्त शहाजी कांबळे यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा गौरवपूर्ण उल्लेख केला. लेखक शहाजी कांबळे यांनी आपल्या मनोगतातून, 'तीन कथासंग्रह आणि दोन ललित लेखसंग्रह यांच्या प्रकाशनानंतर आज मैत्रीदिनानिमित्त पत्नी, कुटुंबीय आणि मित्रपरिवार यांच्या सहकार्याने माझे सहावे प्रवासवर्णनपर पुस्तक प्रकाशित होत आहे. मनात कोणतेही पूर्वग्रह न बाळगता सर्वधर्मसमभाव या जाणिवेतून जगात जे जे सुंदर, उदात्त अन् अद्भुत आहे ते ते मी मन:पूर्वक डोळे भरून पाहिले; आणि मी अनुभवलेला आनंद वाचकांनाही मिळावा म्हणून ते शब्दांकित केले आहे!' अशी भावना व्यक्त केली. अथर्वशीर्षपठण, दीपप्रज्वलन आणि त्रिवार ओंकाराने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. नीलिमा कांबळे, कांबळे मित्रपरिवार आणि ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवड कार्यकारिणी यांनी संयोजनात सहकार्य केले. शामकांत खटावकर यांनी सूत्रसंचालन केले. सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### कासारवाडी रेल्वे गेट बचावासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी : कासारवाडी रेल्वे गेट बंद करण्याच्या प्रस्तावाविरोधात कासारवाडी नागरी कृती समितीच्या वतीने आज (दि.०२) कासारवाडी रेल्वे गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या जनस्वाक्षरी मोहिमेला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. अवघ्या ३ तासांत सुमारे ११०० नागरिकांनी स्वाक्षरी करून रेल्वे गेट बंद करण्याचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली. या मोहिमेदरम्यान रेल्वे गेट परिसरात नागरिकांना गेट बंद झाल्यास उद्भवणाऱ्या अडचणींची माहिती देण्यात आली. रेल्वे गेट हे कासारवाडीच्या गेटवरील व गेटखालील भागांना जोडणारा प्रमुख दुवा असून स्मशानभूमी, गणेश विसर्जन घाट तसेच धार्मिक व सामाजिक मिरवणुकांसाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्याचे नागरिकांनी सांगितले. या जनस्वाक्षरी मोहिमेत ॲड.अमित चौकडे, सनी साळवी, अनिल घोरपडे, ॲड.अजित शिंदे, गुरुनाथ कुरले, पंकज तांबे, राहुल धोणे, संभाजी शेंडगे, जयदीप साने, सक्षम देसाई यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. कासारवाडी नागरी कृती समितीचे संयोजक श्री. संजय शेंडगे सर म्हणाले, "आमचा विकासाला कोणताही विरोध नाही. मात्र विकासाच्या नावाखाली नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणे योग्य नाही. कासारवाडी रेल्वे गेट हे हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे.



गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मावळ तालुक्यातील निसर्गसौंदर्य खुलून आले असून, शनिवार व रविवारच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटकांनी मळवली, भाजे आणि कार्ला परिसरात मोठी गर्दी केली. विशेषतः भाजे येथील धबधब्यावर पर्यटकांनी पावसात भिजत मनमुराद आनंद लुटला. धबधब्याखाली सेल्फी, फोटोग्राफी आणि जलक्रीडेचा आनंद घेत परिसर दिवसभर पर्यटकांनी गजबजून गेला.

# घरकुलमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**■ पिंपरी (दै. संध्या)**

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त घरकुल परिसरात सामाजिक सलोखा, समता आणि परिवर्तनाचा संदेश देणारा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. जगविख्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठान, घरकुल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या जयंती सोहळ्यात नागरिक, समाजबांधव, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अण्णाभाऊंना अभिवादन केले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मारुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक परिवर्तनासाठीच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत जाधव उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात अण्णाभाऊ साठे यांनी कष्टकरी, वंचित आणि शोषित समाजाच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी आपल्या साहित्याच्या माध्यमातून उभारलेला संघर्ष आजही समाजाला प्रेरणा देणारा असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांचा प्रसार प्रत्येक घरापर्यंत होणे ही काळाची गरज असून, सामाजिक समता आणि बंधुभावाची मूल्ये जपण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदानाला उजाळा देण्यात आला. विविध मान्यवरांनी आपल्या मनोगतातून अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. समाजात शिक्षण, समता आणि परिवर्तनाची चळवळ अधिक बळकट करण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. या जयंती सोहळ्यात महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. संपूर्ण घरकुल परिसर अण्णाभाऊ साठे यांच्या जयघोषाने दुमदुमून गेला असून सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले होते. "अण्णाभाऊ साठे यांनी दिलेला समतेचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवून त्यांचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल," अशी भावना कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## महाराष्ट्रात पहिल्यांदाच झालेल्या 'साहित्यरत्न दौड मध्ये' हजारो पिंपरी चिंचवडकर एकत्र धावले




**■ पिंपरी (दै. संध्या)**

लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यान चौकात अत्यंत दणक्यात, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात 'साहित्यरत्न दौड २०२६' पार पडली. उल्लेखनीय म्हणजे साहित्यरत्न दौडमध्ये नागरिक, युवक आणि क्रीडाप्रेमींनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून २२०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आमदार अमित गोरखे साहेब यांचे विशेष अभिनंदन केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे पिंपरी-चिंचवड प्रबोधन पर्व २०२६' या साप्ताहिकाअंतर्गत हा भव्य उपक्रम राबवण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन, आर्टी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि कलारंग यांच्या संयुक्त सहकार्याने या आगळ्यावेगळ्या दौडचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार अमित गोरखे यांच्या कुशल नेतृत्वाखाली पार पडलेल्या या दौडमध्ये अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत... तसेच पिंपरी-चिंचवडसह विविध शहरांतून आलेल्या हजारो नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नागरिकांच्या अफाट उपस्थितीने बर्ड व्हॅली उद्यान परिसर अक्षरशः दुमदुमून गेला होता.




## अश्लील व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा

**■ पिंपरी (दै. संध्या)**

तरुणीचे अश्लील व्हिडिओ तयार करून ते इन्स्टाग्रामवर प्रसारित करत तिचे लैंगिक आणि मानसिक शोषण करणाऱ्या एकाला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने ६ महिन्यांची सक्तमजुरी आणि दंड ठोठावला आहे.

प्रभाकर ऊर्फ लकी जमिनीकांत परिडा (वय २५, रा. अर्चना पॅराडाईज, लेबर कॅम्प, महम्मदवाडी, पुणे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी बिभुप्रसाद परिंडा याने पीडित मुलीचे अश्लील व्हिडिओ तयार केले होते. हे व्हिडिओ त्याने आरोपी प्रभाकर (लकी) याला पाठवले. त्यानंतर प्रभाकरने ते व्हिडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल करून पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. याप्रकरणी सुरुवातीला पौड पोलीस ठाण्यात (पुणे ग्रामीण) गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हा गुन्हा तपासासाठी बावधन पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान आरोपींनी पीडितेचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले. पोलीस निरीक्षक (गुन्हे) भास्कर कदम यांनी तातडीने आरोपींचा शोध घेऊन त्यांच्याविरोधात भक्कम पुरावे गोळा केले आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. पुण्यातील शिवाजीनगर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. यु. वडगावकर यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने सबळ पुरावे ग्राह्य धरून आरोपी प्रभाकर परिडा याला ६ महिने सक्तमजुरी २०० रुपये दंड (दंड न भरल्यास अतिरिक्त ३ दिवस सक्तमजुरी) अशी शिक्षा सुनावली.

ही कामगिरी पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव वरिष्ठ निरीक्षक अरविंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तात्कालीन निरीक्षक भास्कर कदम यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास केला. तर सरकारी अभियोक्ता म्हणून अरुंधती ब्रम्हे, कोर्ट पैरवी अधिकारी अशोक सकुंडे, सेशन कोर्ट अंमलदार पाखरे आणि शिंदे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# ताथवडेतील अत्याचाराने संताप; फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून कठोर शिक्षा द्या



**■ पिंपरी (दै. संध्या)**

ताथवडे परिसरातील दोन सख्ख्या अल्पवयीन बहिणींवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणामुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, आरोपीवर फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवून कठोरातील कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

मनसेने निवेदनात म्हटले आहे की, शहरात महिला व अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अशा गंभीर गुन्ह्यांतील आरोपींवर POCSO कायद्यान्वये कठोर कलमे लावून फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवावा, विशेष सरकारी वकील नियुक्त करावा आणि पीडित कुटुंबाला वैद्यकीय उपचार, समुपदेशन, कायदेशीर तसेच आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मनसेने केली आहे.

यासोबतच शहरातील शाळा, वस्त्या आणि निर्जन भागांमध्ये पोलीस गस्त वाढविणे, सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करणे आणि निर्भया पथकाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या प्रकरणात तातडीने ठोस कारवाई करून त्याचा अहवाल सादर करावा.

अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र रस्ता आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी छावा संघटनेचे धनाजी येळकर, मनसेचे राजू सावळे, सिद्धेश सोनकवडे, प्रबुद्ध कांबळे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### एटीएममध्ये हातचलाखीने शेतकऱ्याची ₹३३ हजारांची फसवणूक

नी रा : दैनिक संध्या

नीरा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या एटीएममध्ये हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करून एका शेतकऱ्याच्या खात्यातील ₹३३ हजारांची रक्कम लंपास केल्याची घटना बुधवारी (दि. २९) दुपारी घडली. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पिंगोरी (ता. पुरंदर) येथील आदर्शनगरमधील रहिवासी शांताराम बापुराव शिंदे (वय ६५) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. शिंदे हे घरासमोर पत्र्याचे शेड उभारण्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी मित्रासह नीरा येथे गेले होते. पैसे काढण्यासाठी त्यांनी एसबीआयच्या एटीएममध्ये बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम कार्ड वापरले. पहिल्या प्रयत्नात व्यवहार अयशस्वी झाला. त्यानंतर पुन्हा प्रयत्न करून त्यांनी ₹३,००० काढले. यावेळी कार्ड मशीनमध्ये असतानाच काळा शर्ट व काळी पँट परिधान केलेला सुमारे ३५ वर्षांचा एक अनोळखी इसम त्यांच्या जवळ आला. त्याने मशीनमधील कार्ड काढून शिंदे यांच्या हातात दिले. ते स्वतःचेच कार्ड असल्याचा समज करून शिंदे ते घेऊन बाहेर पडले. काही वेळाने पुन्हा पैसे काढण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने शिंदे यांनी बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत जाऊन कार्ड तपासले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्यांच्या हातात असलेले कार्ड दुसऱ्या व्यक्तीचे असून त्यांच्या खात्यातून ₹३३ हजारांची रक्कम काढण्यात आली आहे. अज्ञात भामट्याने हातचलाखीने कार्डची अदलाबदल करून ही फसवणूक केल्याचे उघड झाले. या प्रकरणाचा पुढील तपास जेजुरी पोलीस करीत असून एटीएममधील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयिताचा शोध सुरू आहे. नागरिकांनी एटीएममध्ये व्यवहार करताना अनोळखी व्यक्तींची मदत घेऊ नये तसेच कार्ड व पिनची गोपनीयता राखावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### जेजुरीच्या कडेपठार मूळस्थानावर गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात संपन्न;

जेजुरी : दैनिक संध्या

दिनांक 30 तीर्थक्षेत्र श्री कडेपठार (मूळस्थान) येथे 'श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी' च्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांना पंचक्रोशीतील शेकडो भाविकांनी हजेरी लावली होती.सालाबादप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवादरम्यान देवांची आकर्षक चक्क्याची पूजा, रुद्राभिषेक, विधीवत भजन आणि नामस्मरण करण्यात आले. यानंतर भाविकांच्या उपस्थितीत खंडोबा देवाची महाआरती संपन्न झाली. या पवित्र प्रसंगी उपस्थित सर्व भाविकांनी "जय मल्हार" च्या जयघोषात महाराजांच्या आशीर्वादाचा लाभ घेतला.या सोहळ्याला सचिन उपाध्ये गुरुजी चंदन कांबळे, गणेश सावंत यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर आणि शेकडो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, पुजारी सेवक वर्ग ,नित्य सेवेकरी, ग्रामस्थांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

### मोतीबिंदूमुळे अंधारात राहू नका; वेळेवर तपासणी करून घ्या

जुन्नरः दैनिक संध्या

डिसेंट फाउंडेशन, जुन्नर, ता. जुन्नर (पुणे) आणि शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने वै. ह.भ.प. गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे आश्रम, जुन्नर येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १०३ नेत्ररुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ३८ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, त्यांना पुढील उपचारांसाठी शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल येथे पाठविण्यात आले. डिसेंट फाउंडेशनच्या वतीने ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध व्हावी, तसेच आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णांना मदत मिळावी, या उद्देशाने नियमितपणे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली जात आहेत. या शिबिरात नेत्रतज्ज्ञांकडून रुग्णांची प्राथमिक नेत्र तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचारांची माहिती देण्यात आली. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना प्रवास, निवास, नाश्ता, जेवण, एक महिन्याची औषधे तसेच चष्मा या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे गरजू रुग्णांना उपचाराचा कोणताही आर्थिक भार सहन करावा लागत नाही. यावेळी डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून “एकही गरजू अंधारात राहू नये, हाच संकल्प” या भावनेतून नागरिकांनी आपल्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यावी, तसेच परिसरातील गरजू व्यक्तींनाही या मोफत आरोग्यसेवेची माहिती द्यावी, असे आवाहन डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार यांनी केले. डिसेंट फाउंडेशनच्या आरोग्यविषयक उपक्रमांतर्गत गेल्या काही काळापासून जुन्नर तालुक्यासह विविध ग्रामीण भागात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे सात हजारापेक्षा जास्त गरजू नागरिकांना पुन्हा नवी दृष्टी मिळण्यास मदत झाली आहे. याप्रसंगी शंकरा आय हॉस्पिटल चे शिबीर समन्वयक विजय बामणे, डॉ.श्रेया दास ,डॉ. मानसी शहा व त्यांची सर्व टीम, श्रावण घोगरे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्तित होते . शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच शंकरा आय हॉस्पिटल, पनवेलच्या वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले.

### सुभाषअण्णा कुल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

यवत : दैनिक संध्या

गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा भारतीय संस्कृतीतील पवित्र सण गुरुपौर्णिमा सुभाष अण्णा कुल अध्यापक विद्यालय व सुभाष अण्णा कुल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटस येथे अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास डी एल एड व बी.एड. महाविद्यालयातील सर्व छात्राध्यापक, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन प्रा. विजय गायकवाड यांनी अत्यंत सुयोग्य पद्धतीने केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा तिखे या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. विजय जाधव उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एड. विभागातील छात्राध्यापिका कु. मृणाली शिंदे यांनी आपल्या प्रभावी, ओजस्वी आणि नेटक्या निवेदनशैलीत उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छात्राध्यापिका कु. दीपांजली आवळे यांनी सुमधुर व ओजस्वी स्वरात महिमागान सादर करून संपूर्ण सभागृह भक्तिमय वातावरणाने भारावून टाकले. यानंतर अनेक छात्राध्यापकांनी गुरुंच्या ऋणाविषयी कृतज्ञता व्यक्त करत आपल्या भावना मनोगताच्या माध्यमातून मांडल्या. महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही गुरु-शिष्य नात्याचे महत्त्व, शिक्षणातील मूल्ये आणि शिक्षकांची समाजनिर्मितीतील भूमिका यावर प्रेरणादायी विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे प्रा. विजय जाधव यांनी आपल्या मनोगतात भारतीय संस्कृतीतील गुरुंचे स्थान, ज्ञानपरंपरेचे महत्त्व आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात घडविलेल्या परिवर्तनाचा प्रभाव यावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. नीलिमा तिखे यांनी गुरु-शिष्य परंपरेची उज्ज्वल परंपरा जपत विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादनाची अखंड साधना करावी, गुरुंकडून मिळणाऱ्या प्रत्येक शिकवणीचा जीवनात सकारात्मक उपयोग करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करावे.



# नाझरे धरण पूर्ण क्षमतेने भरले

■ जेजुरी (दै. संध्या)

सदैव दुष्काळी असणाऱ्या पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेले व पुरंदर व बारामती तालुक्यातील 45 गावांना पिण्याचे पाणी पुरवठा करणारे नाझरे धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.

जेजुरी जवळील नाझरे धरणाची पाणी साठवणूक क्षमता 788 दशलक्ष घनफूट म्हणजेच पाउन टीएमसी असून मृतसाठा 200 दशलक्ष घनफूट एवढा आहे. तर तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान 496 मिमी आहे. दरवर्षी पुरंदर मध्ये कमी पाऊस पडत असल्याने सतत तालुक्याला दुष्काळाला सामोरे जावे लागते.

जून पासून आत्ता पर्यंत नाझरे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात 320 मिमी पाऊसाची नोंद झाली आहे.

नाझरे धरणातून जेजुरी शहर,जेजुरी औद्योगिक वसाहत,नाझरे प्रादेशिक योजना आदी 30 हून अधिक गावे तर बारामती तालुक्यातील 16 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. तसेच सुमारे एक हजार हेक्टर शेतीला हंगामी स्वरूपाचे पाणी मिळणार आहे.

गतवर्षी सरासरी पेक्षा दुप्पट पाऊसाची नोंद झाली होती.गेल्यावर्षी में आणि जून महिन्यात प्रचंड पाऊस झाला होता.त्यामुळे जून महिन्यातच धरण भरले होते. यावर्षी एप्रिल व मे महिन्यात धरणातील पाणीसाठा मृत साठ्याच्या खाली गेल्याने पाणी टंचाईची परिस्थती निर्माण झाली होती मात्र दोन महिन्यात चांगला पाऊस झाल्याने व धरण भरल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. अजूनही समाधान कारक पाऊस न झाल्याने येथील शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहे.



## अहिल्यादेवी होळकर यांनी सर्वधर्मसमभावाचे कार्य केले

■ पुणे (दै. संध्या)

दिनांक 31 अहिल्यादेवी होळकर यांनी सर्वधर्मसमभावाचे काम करून समाजात एक आदर्श प्रस्थापित केला. जात, लिंगाधारीत भेदभाव अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यात कुठेही आढळत नाही, असे प्रतिपादन डॉ.मनीषा गुप्ते यांनी केले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या जेजुरी येथील शरदचंद्रजी पवार महाविद्यालयाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा चौथा पुरस्कार मासूम संस्थेच्या संस्थापक - विश्वस्त डॉ. मनीषा गुप्ते यांना विजय कोलते यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय कोलते, डॉ. मनीषा गुप्ते, डॉ.रमेश अवस्थी, प्राचार्य डॉ. धनाजी नागणे, सचिव शांताराम पोमण, सहसचिव बंडूकाका जगताप, डॉ. संदीप टिळेकर, माई कोलते मंगेश घोणे, सचिन पेशवे, राजेंद्र पेशवे, अरुण जोशी, संभाजी काळाणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. गुप्ते पुढे म्हणाल्या की, मासूम दहा जिल्ह्यात काम करते आहे. आरोग्य, शिक्षण, महिला, वंचित समूह,युवा, यांसारख्या क्षेत्रांत मासूमने भरीव काम केले आहे. समाजामध्ये सध्या आरोग्य, शिक्षण, बेरोजगारी यासारखी मोठे प्रश्न आहेत. युवा पिढी ही आजची आशेची किरण आहे. नव्या पिढीचे आपण काही ऐकणार आहोत का? त्यांची भाषा समजून घेणार आहोत का असे प्रश्न उपस्थित करून सत्याचा शोध आणि सत्याचा आग्रह धरण्याची आज आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांनी केले.

सन्मानपत्राचे वाचन प्रा. डॉ.अरुण कोळेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोरी ताकवले यांनी तर आभार बंडुकाका जगताप यांनी मानले.

## खुड्डेमुक्त रस्ते, कोंडीमुक्त वाहतूक अन् कचरा नियोजनासाठी “डेडलाईन”

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्ते, वाहतूक, अतिक्रमण, सार्वजनिक वाहतूक, स्वच्छता आणि नागरी सुविधांशी संबंधित प्रश्नांवर सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांच्या तक्रारी वाढल्या आहेत. पावसाळ्यामुळे अनेक ठिकाणी कोंडी निर्माण झालेली आहे. तसेच, मोशीतील कचरा डेपोवर झालेल्या दुर्घटनेनंतर कचरा संकलन नियोजन कोलमडले आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ आणि दीर्घकालीन उपायोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाला महिनाभराची “डेडलाईन” देण्यात आली आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत भोसरी विधानसभा मतदार संघासह शहरातील नागरी समस्यांबाबत सविस्तर आढावा बैठक घेत प्रशासनाला ठोस आणि कालबद्ध उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी संयुक्तपणे काम करत प्रत्यक्ष पाहणी करून अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी क-प्रभाग अध्यक्ष नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, ई-प्रभाग अध्यक्षा अर्चना सस्ते, फ- प्रभाग अध्यक्षा शिवानी नरळे आणि ल- प्रभाग अध्यक्षा रेखा देवकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त निलेश देशमुख यांच्यासह पोलीस, वाहतूक पोलीस अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शहरातील रस्ते आणि पदपथ खड्डेमुक्त करण्यावर विशेष भर देण्यात आला. पदपथ, दुभाजक, चौक आणि सर्कल परिसरातील सर्व खड्डे तातडीने बुजवून व्यापक खड्डेमुक्त मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः प्रत्यक्ष पाहणी करून त्रुटींची नोंद घ्यावी आणि त्यानुसार कामे पूर्ण करावीत, असेही स्पष्ट करण्यात आले. शहरातील बीआरटी मार्ग अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले. विकास आराखड्यातील रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणांची संपूर्ण यादी तयार करून नियोजनबद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. नाशिक फाटा ते दापोडी या मार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी तातडीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

## नेताजी सुभाषचंद्र बोस बॉईज मिलिटरी स्कूल फुलगाव या संघाने प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

■ पिंपरी (दै. संध्या)

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पुणे जिल्हा क्रीडा परिषद आयोजित जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत १५ वर्षाखालील मुलांच्या गटात नेताजी सुभाषचंद्र बोस बॉईज मिलिटरी स्कूल फुलगाव या संघाने प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक स्कूल फुलगाव येथील मैदानावर संपन्न झाल्या या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातून सुमारे ५० संघाने सहभाग घेतला होता. स्पर्धेतील अंतिम सामना नेताजी सुभाषचंद्र बोस बॉईज मिलिटरी स्कूल या संघाने होली एंजल हायस्कूल उरुळी कांचन या संघाचा नऊ-शून्य असा गोल फरकाने पराभव करुन विजेतेपद मिळवला. या विजयी संघाला शाळेची क्रीडा विभाग प्रमुख व राष्ट्रीय फुटबॉल प्रशिक्षक तानाजी पाटील व प्रशिल धांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले या विजयी संघाचे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, क्रीडा अधिकारी दादासाहेव देवकाते, क्रीडा मार्गदर्शक शिवाजी कोळी, लोकसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिपक पायगुडे, संचालक वैदिक पायगुडे, लोकसेवा प्रतिष्ठान शैक्षणिक संचालक नरहरी पाटील, नेताजी सुभाष चंद्र बोस बॉईज मिलिटरी स्कूलचे प्राचार्य शरद मंडलिक व लोकसेवा इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य सुरेश पाटील सैनिकी शाळेचे उपप्रचार्य विकास तिरकुंडे, प्रशासकीय प्रमुख पांडुरंग जगताप, प्रशासन प्रमुख अर्जुन शिंदे यांनी विशेष अभिनंदन केले. पुढील आठवड्यात अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी विजयी संघाची निवड झाली आहे. जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे संपूर्ण आयोजन नेताजी सुभाष चंद्र बोस मिलिटरी स्कूल चे क्रीडा विभाग प्रमुख तानाजी पाटील, प्रशिल धांडे, किरण बागुल, अनिल चव्हाण, महेश टकले, सागर पवार, रोहित कोलेकर, आदित्य रोकडे, कल्पना काळे, राहुल हरगुडे, व सर्व क्रीडाशिक्षक इतर कर्मचारी यांनी केले यावेळी विजयी संघास बक्षीस वितरण लोकसेवा प्रतिष्ठानचे शैक्षणिक संचालक नरहरी पाटील, प्राचार्य शरद मंडलिक सीनियर कॉर्डिनेटर पुनम भोसले लोकसेवा इंग्लिश मीडियम स्कूलचे प्रशासनाधिकारी अर्जुन शिंदे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. स्पर्धा प्रमुख फारुख शेख यांच्या नेतृत्वाखाली पंच म्हणून महेश हुल्लेकर, संतोष कांबळे, आरजित गुराई, अमन पठाण, दर्शन पवार, अनुज कामाठी, ऐलिया यम्मार व सारंग जठार यांनी काम पाहिले.








दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती

■ नागपूर (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'रामगिरी' येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती.

विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करताना व्यसनमुक्त, निरोगी आणि सक्षम युवा शक्ती घडविण्याचा संकल्प या अभियानाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे. युवकांनी अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, कौशल्य, क्रीडा आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. व्यसनमुक्त भारत आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, पालक, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' हे अभियान युवकांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती निर्माण करून त्यांना सकारात्मक, निरोगी आणि जबाबदार जीवनशैलीकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे

### वीजांचा कडकडाट आणि वेधशाळेचा अंदाज

मुंबई : मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता विविध जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे. ३ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यांतील घाट परिसरात जोरदार पावसाची शक्यता असून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच नंदुरबार, नाशिक घाट परिसर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. ०२ ऑगस्ट २०२६ रोजी रायगड, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर, रत्नागिरी, कोल्हापूर, अकोला, वाशीम, अमरावती, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ०३ ऑगस्ट २०२६ रोजी रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे. ०४ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ०५ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाच्या काळात आवश्यक ती खबरदारी घ्यावी, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा तसेच स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

### अण्णा भाऊ साठे यांचे विचार प्रेरणा देणारे

नाशिक : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्यनिर्मिती नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. श्रमिक, वंचित, दलित, भटके-विमुक्त, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज दिला. श्रमाला प्रतिष्ठा, सामाजिक समता आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा देणारे त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. महाकवी कालिदास कलामंदिर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात तसेच त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी मंत्री श्री भुजबळ बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके – आहेर, आमदार देवयानी फरांदे, आमदार हिरामण खोसकर, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी महापौर विनायक पांडे, उप महापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, रंजन ठाकरे उपस्थित होते.

### राहुल गांधींकडून 'जेन झी'ला शुभेच्छा

मुंबई : विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे जेन झी सोबत संवाद साधण्यासाठी अलीकडच्या काळात सोशल मीडियावर चांगलेच सक्रिय झाल्याचे पहायला मिळत आहेत. जागतिक मैत्री दिनाचं औचित्य साधून त्यांनी रविवारी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, त्यांनी जेन झी स्टाईलने फ्रेंडशिप डेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी इन्स्टाग्रामवर आपला फोटो पोस्ट करताना कोरियन 'फिंगर हार्ट' इमोजीचा वापर केला आहे. या पोस्टमध्ये आपण अजूनही एक विद्यार्थी असून दररोज काहीतरी नवीन शकत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी यांचा हा व्हिडिओ चांगलाच चर्चेत आला आहे. राहुल गांधी यांनी जागतिक मैत्री दिनाच्या पार्श्वभूमीवर एक फोटो पोस्ट केला आहे. या पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटलं आहे की मी अजूनही एक विद्यार्थी आहे, दररोज काहीतरी नवीन शिकत असतो. आजचा धडा हा आहे की, आज फ्रेंडशिप डे आहे, सगळ्यांना फ्रेंडशिप डे च्या शुभेच्छा, खूप सगळं प्रेम. अशी पोस्ट राहुल गांधी यांनी केली आहे. दरम्यान त्यापूर्वी शनिवारी नीट परीक्षेचा पेपर लीक झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या, त्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबासोबत राहुल गांधी यांनी संवाद साधला होता. त्यांनी याचे काही फोटो देखील सोशल मीडियावर शेअर केले होते.

# सुरक्षित, सन्मानित आणि उज्ज्वल बालपणासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची प्रभावी भूमिका

**सुरक्षित, सन्मानित आणि आनंदी बालपण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे. राज्य बाल हक्क संरक्षण आयोग हा केवळ तक्रार निवारण करणारा संस्थात्मक मंच नसून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. शासन, पालक, शिक्षक, पोलीस, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी समन्वयाने कार्य केल्यास बालकांवरील अत्याचार, शोषण आणि भेदभाव रोखणे शक्य होईल. प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरण, समान संधी आणि उज्ज्वल भविष्य मिळावे, हीच आयोगाची आणि संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे**

■ मुंबई (दै. संध्या)

बालक हे देशाचे भविष्य असून त्यांच्या सुरक्षित, सन्मानित आणि सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही शासन आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. बालकांवरील अत्याचार, शोषण, भेदभाव, बालमजुरी, बालविवाह, लैंगिक अत्याचार, ऑनलाईन छळ, शिक्षणापासून वंचित राहणे किंवा मानसिक त्रास अशा कोणत्याही परिस्थितीत त्यांना तातडीने संरक्षण आणि न्याय मिळावा, यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कार्यरत आहे. बालकांच्या संविधानिक आणि कायदेशीर हक्कांचे रक्षण करणे, त्यांच्या तक्रारींची दखल घेणे आणि संबंधित यंत्रणांमार्फत प्रभावी कार्यवाही सुनिश्चित करणे हे आयोगाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

प्रत्येक बालकाला जन्मापासून जीवन, संरक्षण, शिक्षण, आरोग्य, पोषण, विकास आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, सामाजिक किंवा आर्थिक स्थिती, अपंगत्व किंवा इतर कोणत्याही कारणावरून बालकांशी भेदभाव करता येत नाही. प्रत्येक बालकाला दर्जेदार आरोग्यसेवा, शिक्षण, सामाजिक सुरक्षा, खेळ, विश्रांती, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा तसेच व्यक्तिमत्त्व, बुद्धिमत्ता आणि शारीरिक क्षमतांचा सर्वांगीण विकास करण्याचा अधिकार आहे.

याशिवाय कोणत्याही बालकाचे अपहरण, तस्करी, विक्री, आर्थिक किंवा लैंगिक शोषण, बालमजुरी किंवा अंमली पदार्थांच्या गैरवापरात सहभागी होणे रोखणे ही राज्य आणि समाजाची जबाबदारी आहे. कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या तसेच मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या दिव्यांग बालकांना विशेष संरक्षण, सन्मानपूर्वक जीवन आणि समाजात सक्रिय सहभागाची संधी मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.

**आयोगाची कार्यक्षेत्रे आणि जबाबदाऱ्या**

राज्य बाल हक्क संरक्षण आयोग बालकांच्या हितासाठी विविध स्तरांवर काम करतो. बालकांवरील अत्याचार, शोषण, दुर्लक्ष आणि भेदभावासंदर्भातील तक्रारींची चौकशी करून त्यावर आवश्यक कार्यवाही केली जाते. बाल संरक्षणासंबंधीचे कायदे, धोरणे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही यावर आयोग देखरेख ठेवतो.

बालगृहे, निरीक्षण गृहे, विशेष गृहे आणि इतर बालसंस्थांची नियमित पाहणी करून तेथील सुविधा आणि बालकांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित केले जाते. तसेच बाल संरक्षण, शिक्षण, आरोग्य व पोषण, बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, पोक्सो कायद्याची अंमलबजावणी, बालतस्करी प्रतिबंध आणि बालहक्कांविषयी जनजागृती यांसारख्या विषयांवर आयोग सातत्याने काम करतो.

घरातून पळून गेलेली किंवा हरवलेली मुले, रस्त्यावर राहणारी मुले, बालमजूर, घरगुती काम करणारी मुले, लैंगिक किंवा शारीरिक अत्याचाराला बळी पडलेली मुले, तस्करीची शिकार झालेली मुले, भावनिक आधाराची गरज असलेली मुले तसेच पालकांनी सोडून दिलेली मुले अशा संकटग्रस्त बालकांच्या संरक्षणासाठी आयोग विविध यंत्रणांच्या माध्यमातून कार्यरत आहे.

कोणत्याही बालकासोबत शोषणाची घटना घडल्यास संबंधित पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक किंवा बाल कल्याण पोलीस अधिकाऱ्याशी तातडीने संपर्क साधता येतो. प्रत्येक जिल्ह्यात बाल न्याय व्यवस्था उपलब्ध असून बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाते.

कायद्याच्या विरोधात आढळलेल्या किंवा गुन्ह्यात आरोपित असलेल्या मुलांनाही सन्मानपूर्वक आणि न्याय्य वागणूक मिळणे हा त्यांचा कायदेशीर अधिकार आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेले बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) संबंधित प्रकरणांवर सुनावणी करून पुनर्वसन आणि न्याय या दोन्ही बाबींना प्राधान्य देते.

बालकांच्या संरक्षणासाठी केवळ शासन नव्हे तर समाजाचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. या उद्देशाने राज्यात मंत्री आदिती तटकरे यांनी नुकतेच बालविवाह, बाल संरक्षण आणि शिक्षण यावर भर देणारी बालस्नेही पंचायत राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. बालकांपर्यंत त्यांचे हक्क आणि अधिकारी या बालस्नेही पंचायतच्या माध्यमातून पोहोचणार आहेत. हा उपक्रम राबविण्यासाठी युनिसेफ आणि यशदा यांच्या सहकार्याने विविध गावांमध्ये बालस्नेही वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

बालकांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी मन मुक्त फाऊंडेशनच्या सहकार्याने दहा जिल्ह्यांमध्ये विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहेत. पालघर जिल्ह्यात शाळांमध्ये मॅजिक बॉक्स थिंकिंग कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि सकारात्मक विचारक्षमतेचा विकास केला जात आहे.

**प्रशिक्षण, जनजागृती आणि सायबर सुरक्षा**


बाल सुरक्षा अभियानांतर्गत शिक्षक, पोलीस अधिकारी, महिला व बालविकास विभागातील अधिकारी तसेच विविध संस्थांच्या प्रतिनिधींसाठी राज्यभर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. बालकांच्या ऑनलाईन सुरक्षिततेसाठी सायबर सुरक्षा आणि डिजिटल जबाबदारीविषयी मार्गदर्शन सत्रेही आयोजित केली जात आहेत.

होप फाउंडेशनच्या सहकार्याने पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बालस्नेही कार्यपद्धतीचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच पोक्सो कायद्यानुसार नियुक्त सहायक व्यक्तींसाठी नियमित प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजनही आयोगामार्फत केले जाते.

बाल संरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी आयोगाने अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम प्रस्तावित केले आहेत. चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रात बालकलाकारांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येणार आहे. गावांच्या पुरस्कार निकषांमध्ये बालसुरक्षेचा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. तृतीयपंथीय बालकांसाठी स्वतंत्र धोरण, लहान मुलांच्या ऑनलाईन वापराबाबत मार्गदर्शक तत्त्वे आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये सर्व विभागांसाठी एकसमान कार्यपद्धती (SOP) विकसित करण्याचे नियोजन आहे.

याशिवाय ग्रामस्तरावर बालपंचायतींचे बळकटीकरण, बाल सुरक्षा पथके, बालमजुरीविरोधी विशेष मोहीम, बालविवाह प्रतिबंधासाठी व्यापक जनजागृती तसेच एनएसएस स्वयंसेवक, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून चाईल्ड हेल्प ग्रुप स्थापन करण्याची योजना आहे. कोणतेही बालक संकटात असल्यास किंवा बालहक्कांचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ आणि आपत्कालीन सेवा ११२ या २४ तास, वर्षभर मोफत उपलब्ध असलेल्या सेवांवर संपर्क साधता येतो. या माध्यमातून बालकांना तातडीची मदत, संरक्षण, समुपदेशन आणि आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही उपलब्ध करून दिली जाते.

- श्रद्धा मेश्राम,
विभागीय संपर्क अधिकारी



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' अभियानाला मोठी गती

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाकांक्षी 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (आयजीजीएमसी), नागपूर आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्युसीएल) यांच्यात यासाठी ₹५ कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाची विदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, मार्च २०२७ पर्यंत विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये २५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या उपक्रमांतर्गत सर्व शस्त्रक्रिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील हजारो नागरिकांना दर्जेदार व मोफत नेत्रोपचार उपलब्ध होणार असून, त्यांच्या दृष्टीचे संरक्षण करण्यास मोठी मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पाठबळामुळेच आयजीजीएमसी, नागपूरला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ₹५ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीमुळे संपूर्ण विदर्भात व्यापक स्तरावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया राबविणे शक्य होणार असून, 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' हे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या उपक्रमामुळे केवळ मोतीबिंदूमुळे दृष्टी गमावण्याचे प्रमाण कमी होणार नाही, तर समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही दर्जेदार नेत्रोपचार सहज उपलब्ध होतील. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात शासन, वैद्यकीय संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग यांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाद्वारे विदर्भातील हजारो नागरिकांच्या जीवनात नवा प्रकाश निर्माण होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शासन आपल्या दारी'सोबत आता समाधानही – विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर

■ मुंबई (दै. संध्या)

महसूल विभागाच्या सेवा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' हे शासन आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध अधिक घट्ट करणारा उपक्रम आहे. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेपुढे जाऊन नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर समाधानकारक कार्यवाही करण्याचे काम या शिबिराच्या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले.

मुंबई शहर जिल्ह्यात दि. २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात आले. या अभियानातील अंतिम शिबिराचे आयोजन १८७-कुलाबा विधानसभा मतदारसंघातील रामा आणि सुंदरी वाटूमल सभागृह, के. सी. महाविद्यालय, चर्चगेट येथे करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावर रयतेसाठीचा संघर्ष, न्याय आणि हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य आठवते. त्यांच्या विचारांवर आधारित सक्षम महसूल व्यवस्था निर्माण करण्याचे काम शासन करीत आहे.

महसूल विभाग हा शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या विभागांपैकी एक असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी त्याचा थेट संबंध आहे. मालमत्ता नोंदणीपासून दुष्काळ, पूर आदी नैसर्गिक आपत्तींच्या वेळी पंचनामे करण्यापर्यंत अनेक महत्त्वाची कामे महसूल विभागामार्फत केली जातात, असे नार्वेकर यांनी सांगितले. कुलाबा विधानसभा मतदारसंघात आर्थिकदृष्ट्या विविध स्तरातील नागरिक वास्तव्यास आहेत. प्रत्येक नागरिकाला शासनाच्या सेवा सहज आणि पारदर्शकपणे मिळणे आवश्यक आहे. या शिबिरामुळे नागरिकांचा वेळ वाचत असून विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध होत आहेत.

# केंद्र सरकारकडून राज्यांना कर वितरण; महाराष्ट्राला ७ हजार २२ कोटींचा अतिरिक्त निधी


■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील रखडलेल्या विकासकामांना आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी केंद्र सरकारने महाराष्ट्राला एक मोठा दिलासा दिला आहे. करांच्या वाटपापोटी केंद्र सरकारकडून राज्याला तब्बल ७ हजार २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर झाला आहे. नियमित मिळणाऱ्या मासिक हप्त्याव्यतिरिक्त हा निधी देण्यात आल्याने राज्याच्या तिजोरीत मोलाची भर पडली असून, अनेक महत्त्वाच्या लोककल्याणकारी योजनांना आता नवा बुस्टर डोस मिळण्याची शक्यता आहे. राज्यांच्या वित्तीय व्यवस्थेला बळकटी देत विकासकामांना अधिक गती मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारने आज सर्व राज्यांना १ लाख ९ हजार कोटी रुपयांच्या कर वितरणाची अतिरिक्त अग्रीम हप्ता वितरीत केला आहे.राज्यनिहाय वाटपानुसार, महाराष्ट्राला ७ हजार २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाने ही रक्कम १० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नियमित मासिक कर हस्तांतरणाव्यतिरिक्त वितरित केली आहे. या अतिरिक्त निधीमुळे राज्यांना पायाभूत सुविधा उभारणी, विविध विकास प्रकल्प, भांडवली खर्च तसेच प्राधान्याच्या लोककल्याणकारी योजनांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. यामुळे विकासकामांच्या अंमलबजावणीला गती मिळण्यास आणि निधी नियोजन अधिक सक्षमपणे करण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राला प्राप्त ७ हजार 22 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीमुळे राज्यातील विविध विकास प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक चालना मिळणार आहे. ऑगस्ट महिन्याच्या नियमित हप्त्याव्यतिरिक्त हा निधी थेट राज्याला हस्तांतरित करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील रस्त्यांची कामे, नवीन पायाभूत सुविधा आणि प्राधान्यक्रमानुसार राबवल्या जाणाऱ्या योजनांसाठी मोठा आर्थिक हातभार लागणार आहे.




दैनिक संध्या
सोमवार, दि. ०३ ऑगस्ट २०२६




www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews


## थोडक्यात पण महत्वाचे




### अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पाणी बॉटल व खाद्यपदार्थांचे वाटप

**बारामती : दैनिक संध्या**

बारामती शहरातून निघालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य मिरवणूकीत सामील होत जय जवान गणेश मंडळच्या वतीने निलेश तावरे, शंभूशेठ आगवणे, साजन शिंदे, विशाल व्हटकर, ओंकार ढोले, जमीर शिकीलकर, राजू जवेरी, संदेश मदने, दिपक शाहीर यांनी मिरवणुकीत सहभागी झालेल्या बांधवांना पिण्याच्या पाण्याची बॉटल व खाद्यपदार्थांचे वाटप केले.



### अक्षरसृष्टी संस्थेच्या वतीने १०१ विद्यार्थांना सायकल वाटप

**जेजुरी : दैनिक संध्या**

■ महिलांना शिलाई मशीन, मसाला डंकाचे वाटप

अक्षरसृष्टी संस्था पुणेच्या वतीने जेजुरी येथे पुरंदर तालुक्यातील 101 शालेय विद्यार्थ्यांना सायकल, महिला बचत गटांना 50 शिलाई मशीन, शेवई मशीन, मसाला डंका वाटप व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. जेजुरी येथील मल्हार नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात अक्षर सृष्टी संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थी सायकल व किट, तसेच गरजू महिलांना सक्षमीकरणासाठी साहित्यांचे वाटप करण्यात आले. गेली 26 वर्षे ही संस्था पुरंदर,हवेली,दौंड व बारामती येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, महिला सबलीकरण, शेतकऱ्यासाठी विविध शिबिरे, ओढा खोलीकरण, कृषी पर्यटन, विद्यार्थ्यांसाठी सहली, शिष्यवृत्ती परीक्षा आदी उपक्रम राबवित असल्याचे संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी माजी आमदार संभाजी कुंजीर, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी नाना होळकर, पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ प्राजक्ता दुर्गाडे, माजी सदस्य सुदाम आप्पा इंगळे, जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, शामकांत भिंताडे, गौरव कोलते, विश्वस्त मंगेश घोणे नगरसेवक नगरसेविका आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अक्षर सृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.




### ५१ हजार विद्यार्थिनींची होणार मोफत हिमोग्लोबिन तपासणी

**पुणे : दैनिक संध्या**

■ लायन्स क्लब ऑफ पुना सिटी, श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट आणि घोलप ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

महाविद्यालयीन विद्यार्थिनींमधील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने 'महा संकल्प २०२६' या उपक्रमांतर्गत पुणे शहरातील विविध शैक्षणिक संकुलांमधील सुमारे ५१ हजार विद्यार्थिनींची मोफत हिमोग्लोबिन तपासणी, आरोग्य तपासणी आणि आरोग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न विधी महाविद्यालय, गणेशखिंड येथे झाला. लायन्स क्लब ऑफ पुना सिटी, श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट आणि घोलप ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत असून उद्घाटन लायन्स क्लब इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एमजेएफ श्रेयस दीक्षित यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. अनन्या बिबवे, प्राचार्या, मॉडर्न विधी महाविद्यालय, ज्योत्स्ना एकबोटे, सहसचिव, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, दीपक थोरात, अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ पुना सिटी, दिलीप थोरात, उपाध्यक्ष, दिलीप बांदल, सचिव, बजरंग आकडे, खजिनदार, अमर लांडे, सहसचिव, श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्टचे विश्वस्त, रोहिदास घोलप तसेच घोलप ब्लड सेंटरचे अधिकारी, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे स्वयंसेवक उपस्थित होते. उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन, बोन डेन्सिटी, नेत्र आणि दंत तपासणी मोफत करण्यात आली. तसेच आरोग्य संवर्धन, संतुलित आहार आणि रक्तक्षय प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव ज्योत्स्ना एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच वर्षांपासून महिला व विद्यार्थिनींसाठी आरोग्य तपासणी आणि रक्तदान उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून विद्यार्थिनींचा रक्तदानातील सहभाग वाढवून सकारात्मक सामाजिक उदाहरण निर्माण करण्यात आले आहे. दीपक थोरात आणि दिलीप बांदल म्हणाले, आगामी काळात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सर्व महाविद्यालयांमध्ये तसेच विविध शैक्षणिक संकुलांमध्ये हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट आणि लायन्स क्लब ऑफ पुना सिटी यांच्या देणगी सहयोगातून महाराष्ट्रात प्रथमच ब्लड बँकेसाठी 'एजीचेक' नॉन-इन्व्हेसिव्ह हिमोग्लोबिन स्क्रीनिंग डिव्हाइस प्रदान करण्यात आले. या उपकरणाच्या साहाय्याने केवळ बोटाच्या स्पर्शाने तात्काळ डिजिटल पद्धतीने हिमोग्लोबिन तपासणी करणे शक्य होत आहे.

### चाकण शहरात विजेचा खेळखंडोबा

**चाकण : दैनिक संध्या**

महावितरण विभागाकडून कोणतीही पूर्वसूचना न देता भारनियमनाच्या नावाखाली वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी रडकुंडीला आले आहेत. चाकण शहर व परिसरात विजेचा खेळखंडोबा सुरू असून, क्षणाक्षणाला बत्ती गुल होत असल्याने शेतकरी, महिला व विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. सर्वांनाच मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून या गंभीर परिस्थितीची दखल घेणे अपेक्षित आहे. सध्या चाकण भागातील वाडी - वस्तीवर सिंगल फेज वीजपुरवठा होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाला आहे. कुट्टी मशीन, स्ट्रीट लाईट, दुध काढण्याच्या मशीन, पिठाच्या गिरण्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे विज पंप, यांसारखी अनेक उपकरणे पूर्णपणे बंद पडली आहेत. शेती व दुग्ध व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.




## सासवडमध्ये आण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त 'माझी वसुंधरा' अंतर्गत भव्य वृक्षारोपण

**चंदन टेकडी ते बोरावके मळा रस्त्यावर वडाच्या रोपांची लागवड**

■ सासवड (दै. संध्या)

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सासवड नगरपरिषदेच्या वतीने शहर परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधीलकी जपण्यासोबतच शहराचा ऐतिहासिक वडाचा वारसा जपणे आणि पर्यावरण समतोल राखणे, हा यामागील मुख्य उद्देश होता . कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यानंतर 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत पहिल्या टप्प्यात चंदन टेकडी ते बोरावके मळा या मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वडाच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, या उपक्रमाची सुरुवात नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदूकाका जगताप यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली. यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप म्हणाल्या की, "आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून व शाहिरीतून समाजाला जगण्याची नवी दिशा दिली. त्यांच्या विचारसरणीचा वारसा पुढे चालवताना निसर्गाचे रक्षण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल." सासवड नगरपरिषद शहरातील हिरवाई वाढवण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले, तर शहरातील नागरिकांनीही या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी केले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत, सोपान रणपिसे, स्मिता उमेश जगताप, लिना वढणे, स्मिता सुहास जगताप, अर्चना चंद्रशेखर जगताप, कार्यालय अधीक्षक ओंकार शिंदे, नगर अभियंता सारिका कुंभार, सहायक नगररचनाकार निखिल कांचन, शहर समन्वयक राम कारंडे, संजय (मंत्री) जगताप यांच्यासह पदाधिकारी, नगरपालिकेचे कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जेजुरी ग्रामस्थ मंडळाकडून कऱ्हा नदीवर जलपूजन

**नाझरे धरण शंभर टक्के भरल्याने भंडारा उधळून जल्लोष**

■ जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाचा पालखी सोहळा सोमवती दिवशी स्नानासाठी कऱ्हा नदीवर जात असतो. कऱ्हा नदीवर असणारे नाझरे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने श्री खंडोबा पालखी सोहळा खांडेकरी मानकरी समस्त ग्रामस्थ मंडळाच्या वतीने कऱ्हा नदीवर जलपूजन करण्यात आले.

पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेले कऱ्हा नदीवरील नाझरे धरण 100 टक्के भरले आहे. या कऱ्हा नदीवर नाशतीर्थ असून दर सोमवती अमावास्येला महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाचा पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी जात असतो. या नदीला पवित्र स्थान आहे. कऱ्हा नदीवरील नाझरे धरण शंभर टक्के भरल्याने श्री खंडोबा पालखी सोहळा खांडेकरी मानकरी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने व विधिवत जलपूजन करण्यात आले. यावेळी कऱ्हामाईला साडी चोळी अर्पण करण्यात आली. तसेच भंडारा उधळून जल्लोष करण्यात आला.

यावेळी श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,नगराध्यक्ष जयदीप बारभाई, ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी राजाभाऊ पेशवे,गणेश आगलावे, सुधीर गोडसे संतोष खोमणे, संजय खोमणे छबन कुदळे, माऊली खोमणे, जेजुरी भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे श्री मार्तंड देवसंस्थांचे विश्वस्त विश्वस्त पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, नगरसेवक कृष्णा कुदळे योगेश जगताप, रोहित खोमणे, प्रशांत लाखे, रमेश लेंडे नगरसेविका भक्ती कोरपड मंदा बयास, स्वरूपा खोमणे, प्रज्ञा राऊत,योगिता दोडके मोनिका घाडगे, स्नेहल भालेराव,निलम सातभाई आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध - अशोक राक्षे

■ चाकण (दै. संध्या)

कृषी उत्पन्न बाजार समिती, खेडच्या सभापतीपदी अशोक राक्षे आणि उपसभापतीपदी रणजित गाडे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर चाकण आडते असोसिएशनच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. बाजार समितीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात व्यापारी, आडते, हमाल - मापाडी आणि संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाजार समितीचे संचालक माणिक गोरे, महेंद्र गोरे, आडते असोसिएशनचे अध्यक्ष संजय वहिले, बाजार समितीचे माजी संचालक राम गोरे, रविंद्र बोराटे, चांगदेव बोराटे, हमाल-मापाडी संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे, कुमार गोरे, भानुदास टेंगले, भानुदास बुट्टेपाटील, दशरथ काचोळे, अनिल देशमुख, जगदीश मेदनकर, संतोष खैरे, संभाजी कलवडे, चाकण सोसायटीचे अध्यक्ष दत्तात्रय गोरे, जीवन टोपे, दादाभाऊ हुंडारे, माऊली शेवकरी आदी मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात चाकण सोसायटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दत्तात्रय



गोरे यांचाही आडते असोसिएशनच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी संचालक राम गोरे म्हणाले, "आडते हे शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील विश्वासाचा दुवा आहेत. बाजार समितीची चांगली परंपरा आणि पारदर्शक कारभार नव्या पदाधिकाऱ्यांनी अधिक सक्षमपणे पुढे न्यावा." सत्काराला उत्तर देताना उपसभापती रणजित गाडे पाटील म्हणाले, "सर्व संचालकांच्या सहकार्यामुळे बाजार समितीने विकासाची नवी उंची गाठली आहे. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या हितासाठी सातत्याने काम करू. शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी त्यांच्या अडचणी सोडविणे, नियमित संवाद ठेवणे आणि बाजार समितीची सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

## श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

■ जुन्नर (दै. संध्या)

रविवार दि.०२ ऑगस्ट २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थी व रविवारची शासकीय सुट्टी तसेच पावसामुळे सुरु झालेले धबधबे व निसर्गरम्य वातावरणामुळे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने सकाळी ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात



आली होती. देवाचे नैवेद्याकरीता पिंपळगाव सिद्धनाथ येथील सागर सुरेश डोके यांनी २ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. संकष्टी चतुर्थी व रविवारची शासकीय सुट्टी तसेच पावसामुळे सुरु झालेले धबधबे व निसर्गरम्य वातावरणामुळे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर गोळेगाव येथील शकुंतला नामदेव कोकणे व जयश्री राजेंद्र शिंदे तसेच मानकरवाडी येथील अर्चना प्रल्हाद मानकर यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## जिल्हा सत्र न्यायाधीशांनी उलगडला बालगृहातील मुलींसमोर जीवन प्रवास

**'लाल दिव्याच्या गाडी'पासून जिल्हा सत्र न्यायाधीशपदापर्यंत...जीवनप्रवासातून मुलींना दिली स्वप्नांची नवी दिशा'**

■ "मोठी स्वप्ने पाहा, न्यायाधीश व्हा आणि समाजासाठी जगा"

■ न्यायमूर्ती अरविंद वानखेडे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

■ पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा'

■ सासवड (दै. संध्या)

"मुलींनो, मी माझेच उदाहरण तुम्हाला देतो..."मी आठवी-नववीत शिकत असताना आमच्या शेतात जाण्याचा रस्ता बसस्थानकावरून जात असे. तिथून लाल दिव्याची एक गाडी जाताना दिसायची. ती कलेक्टरची गाडी असल्याचे बाबांनी सांगितले आणि त्याच क्षणी माझ्या मनात कलेक्टर होण्याचे स्वप्न निर्माण झाले. दुर्दैवाने कलेक्टर -आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही, पण जिद्द सोडली नाही. त्याच चिकाटीमुळे आज मला जिल्हा सत्र न्यायाधीश या सर्वोच्च सांविधानिक पदावर सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे परिस्थिती कितीही कठीण असली तरी ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करा, "मोठी स्वप्ने पाहा, न्यायाधीश व्हा आणि समाजासाठी जगा", या भावनिक शब्दांनी आपल्या मनोगताची सुरुवात करत पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. अरविंद वानखेडे यांनी




बालगृहातील विद्यार्थिनींसमोर आपल्या आयुष्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडला. बुलढाणा जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यातील मुलगा ते पुणे जिल्ह्याचा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हा त्यांचा प्रवास ऐकताना उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर भारावून गेले.

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, येथे गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी आयोजित "गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात" ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. बालगृहातील मुलींशी अत्यंत आपुलकीने संवाद साधताना त्यांनी न्यायव्यवस्थेतील संधी, शिक्षणाचे महत्त्व आणि ध्येयवादी जीवनाची प्रेरणा दिली. "तुमच्यापैकी अनेक मुली उद्या न्यायाधीश, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर किंवा समाजसेविका होऊ शकतात. स्वतःवर विश्वास ठेवा आणि शिक्षणाला कधीही सोडू नका,""मोठी स्वप्ने पाहा, न्यायाधीश व्हा आणि समाजासाठी जगा" असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. ते पुढे म्हणाले, "बालगृह, अनाथालय, मुकबधिर तसेच अंध विद्यार्थ्यांच्या शाळांमधील शिक्षण आणि तेथील उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहेत. येथे ऐकलेली 'माणसाने माणसाशी माणसासारखे वागणे' ही प्रार्थना मानवतेचा खरा संदेश देते. प्रत्येक माणसामध्ये ईश्वराचे रूप पाहून एकमेकांना मदत करणे हेच आपले कर्तव्य आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून आम्ही विविध जनजागृती उपक्रम राबवत असून माईंच्या संस्थेला भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य कायम राहील." विद्यार्थिनींशी संवाद साधताना त्यांनी अनेक प्रश्न विचारले. मुलींनीही आत्मविश्वासाने दिलेल्या उत्तरांचे कौतुक करत त्यांच्या विचारक्षमतेचे अभिनंदन केले. "लहान वयातच मनात ध्येय, सकारात्मक विचार आणि संघर्ष करण्याची तयारी निर्माण झाली, तर यश तुमच्या पावलांशी नक्की येईल," असेही त्यांनी सांगितले.

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव मा. रेवती देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "अपयश हीच यशाची पहिली पायरी आहे. माईंच्या विचारांचा आणि संस्कारांचा अमूल्य ठेवा तुमच्याकडे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कठोर परिश्रमाच्या बळावर इतिहास घडविला. त्यामुळे अपयशाकडे निराशेने नव्हे, तर पुढील यशाची संधी म्हणून पाहा. सकारात्मक दृष्टीकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न तुम्हाला निश्चितच यश मिळवून देतील."असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ममता सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक (दादा) गायकवाड होते.

या कार्यक्रमास पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती देशपांडे, सासवडचे दिवाणी न्यायाधीश टी. पी. मोटे, द्वितीय सह न्यायाधीश आर. ए. सावंत, सह न्यायाधीश एस. जी. सावंत, ममताताई सपकाळ, विनय सपकाळ, सार्थक सेवा संघ (आंबळे)चे अनिल कुडीया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षिका स्मिता पानसरे, सूत्रसंचालन मुकेश चौधरी, तर आभार प्रदर्शन संजय गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, मंजुषा गायकवाड, ज्योती गायकवाड, मोनिका राजगुरू, नाना कुंभारकर, रितेश जांभुळकर, आकाश गोगावले यांच्यासह ममता बाल सदनमधील सर्व कर्मचारीवृंद आणि विद्यार्थिनींनी अथक परिश्रम घेतले.

**अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी न्यायव्यवस्थेची पुढाकाराची ग्वाही**

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक (दादा) गायकवाड यांनी अनाथ, निराधार व निराश्रित मुलांकडे आधार कार्ड, जन्मदाखला, जातीचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रांचा अभाव असल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित केला. यावर पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. अरविंद वानखेडे यांनी तातडीने दखल घेत, संबंधित यंत्रणांची बैठक बोलावून पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील, अशी ठोस ग्वाही दिली. या आश्वासनामुळे अनाथ मुलांच्या शिक्षणाचा मार्ग अधिक सुकर होण्याची आशा व्यक्त करण्यात आली.